
|| श्री जगन्नाथविजय ||
realpatidar.com


॥ श्री जगन्नाथविजय ॥
realpatidar.com
realpatidar.com

realpatidar.com


realpatidar.com
सद्गुरु इमामशाह महाराज
realpatidar.com


ज्ञान प्रकाश देणाऱ्या आदरणीय गुरुवर्यांस आदरपूर्वक समर्पित
ब्र. संतश्री जगन्नाथ महाराज, फैजपूर



श्री जगन्नाथविजय



संदर्भ ग्रंथ – रथ जगन्नाथाचा

पहिली आवृत्ती – मंगळवार दि. १४/१२/२००४

लेखक – श्री. गो. ह. करमरकर, पुणे

श्री जगन्नाथविजय

: प्रकाशक :

आचार्य श्री. जनार्दन महाराज
आचार्य श्री. पुर्णानंद महाराज
श्री सत्पंथ साहित्य प्रकाशन
श्री सत्पंथ मंदीर, फैजपूर (४२५५०३)
ता. यावल जि. जळगाव ☎ (०२५८५) २४५४१७

: संकलन :

आचार्य श्री. जनार्दन महाराज

(किंमत ३० रु.)

: मुद्रक :

विजय ऑफसेट, फैजपूर
ता. यावल, जि. जळगाव ☎ २४५६४२

प्रास्ताविक

'श्री जगन्नाथविजय' हा काव्यमय ग्रंथ म्हणजे सत्पंथ मंदीर संस्थान फैजपूरचे ११ वे ब्रह्मलीन गादीपती आचार्य श्री जगन्नाथ महाराज यांचे चरित्र आहे. पुण्याचे श्री. गो. ह. करमरकर यांनी या ग्रंथाचे लेखन केले आहे. लेखनासाठी त्यांनी 'रथ जगन्नाथाचा' या ग्रंथाचा आधार घेतला आहे. मूळ चरित्रग्रंथ गद्यरुपात आहे. त्याला काव्यबध्द करणे तसे अवघड काम होते; परंतु करमरकरांची काव्यप्रतिभा अशा काव्यमय ग्रंथांच्या लेखनासाठी लीलया संचार करीत असते. ग्रंथ पारायणसुलभ व्हावा म्हणून अनुरुप अशा शब्दांचा वापर त्यांनी केला आहे. हा ग्रंथ वाचल्यावर तो 'रथ जगन्नाथाचा' आधारे लिहिला आहे, हे कुणाला सांगितले तरच लक्षात येण्यासारखे आहे. अन्यथा तो स्वतंत्र ग्रंथ आहे असेच कुणालाही वाटेल. करमरकरांच्या वाणी आणि लेखनीला भक्तीरसाचा स्पर्श झाल्यामुळे त्यांच्या लेखनात प्रासादिकतेचे दर्शन घडते.

भाविकांसाठी जणू ही आचार्य श्री जगन्नाथ महाराजासंबंधीची पोथी आहे. या पोथीच्या वाचनाने महाराज आपल्यात नसले तरी ते आपल्यात आहेत असेच वाटेल. मराठीत 'हरिविजय,' 'रामविजय,' 'कृष्णविजय,' वगैरे जे ग्रंथ आहेत त्यांचे वाचन अजूनही होत असते. हे चरित्रग्रंथ त्या ग्रंथांतील नायकांच्या चरित्राच्या वाचनाने किंवा श्रवणाने आपल्याला जणू नवीन प्रेरणा देत असतात. आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवीत असतात. सत्पंथीयांनाच काय परंतु इतर पंथीयांनादेखील हा ग्रंथ वाचावासा वाटेल तो त्यातील रसात्मकतेमुळे, फैजपुरात जगन्नाथ महाराजांसारखी आध्यात्मिक क्षेत्रातील एक महान, विलक्षण व्यक्ती होऊन गेली हे या ग्रंथाच्या वाचनाने त्यांच्या लक्षात येईल. महाराजांच्या स्मरणाच्या दृष्टीने ही एक महत्त्वाची गोष्ट होणार आहे. भावीकांनी महाराजांच्या या चरित्रामृताचा आस्वाद घेतला तर महाराजांची चिरंतन अशी विजयपताका सतत फडकत राहणार आहे. ती सतत फडकत राहील यात शंका नाही, कारण आचार्य श्री जनार्दन महाराज, आचार्य श्री पूर्णानंद महाराज व ग्रंथासाठी अर्थसाहय्य करणारे चिनावल येथील नारखेडे कुटूंबीय यांच्या श्रध्दाशील प्रेरणेने प्रेरणापीठ पिराण्याचे वर्तमान जगद्गुरु सत्पंथाचार्य श्री. नानकदासजी महाराज यांच्या शुभहस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे.

- प्रा. डॉ. श. रा. राणे, फैजपूर

प्रकाशकाचे दोन शब्द ....

अंधाराचं साम्राज्य नाहीसं करुन चराचराला उजळून टाकण्याचे सामर्थ्य असतं फक्त तेजः पुंज सुर्यामध्ये. या सुर्याप्रमाणेच आमचे जीवनही ज्ञान प्रकाशानं उजळणारे, जीवनाच्या वाटेवर पदोपदी योग्य मार्ग दाखवणारे आमचे श्रध्दास्थान ब्र. संत श्री. जगन्नाथ महाराज यांच्या आशीर्वादानेच ह्या त्यांच्या 'श्री जगन्नाथविजय' चरित्र ग्रंथाचे प्रकाशन होत आहे. 'श्री जगन्नाथविजय' हे नाव तसं खुपच अर्थपुर्ण आहे. संसाररुपी युध्दभुमीवर विजय कसा मिळवता येईल. याचे मार्गदर्शन आपल्याला ह्या चरित्रातून मिळते. पुर्विच्या काळात सत्पंथाचा अनेक समाजकंटकांनी अपप्रचार केला व त्यामुळे सत्पंथी अनुयायांना खुपच त्रास झाला. परंतु अशा परिस्थितीतही श्री. जगन्नाथ महाराजांनी सत्पंथाचा योग्य प्रचार करुन खरा खुरा सत्पंथ समाजापर्यंत पोहचवला. एवढेच नव्हे तर चारही पिठाच्या जगद्‌गुरु शंकराचार्यांना त्यांनी सत्पंथाची ओळख करवून दिली. त्यामुळेच प्रेरणा पीठ हे जगद्‌गुरुंचे पाचवे पीठ स्थापन झाले. येथेच जगन्नाथाचा विजय झाला. यासाठी जगद्‌गुरु श्री. करसनदासजी महाराज यांनीही खुपच परिश्रम घेतले. जगद्‌गुरुंचे पीठ स्थापन झाल्यानंतरच या दोघी दिव्यात्म्यांनी चिर विश्रांती घेतली.

योगायोग म्हणजे ह्या ग्रथांचे प्रकाशन, प.पू. जगन्नाथ महाराज्यांच्या तृतीय पुण्यतिथीच्या दिवशी म्हणजे १४ डिसेंबर २००४ रोजी प्रेरणा पीठाचे वर्तमान जगद्‌गुरु श्री. नानकदासजी महाराज यांच्या शुभहस्ते होत आहे. डॉ. श. रा. राणे यांनी लिहिलेल्या 'रथ जगन्नाथाचा' ह्या चरित्र ग्रंथाचेच हे ओवीबध्द रुपांतर आहे. पुणे येथील सिध्दहस्त लेखक श्री. गो. ह. करमरकर यांनी हे ओवीबध्द लेखन केले आहे. श्री. करमरकरांनी यासाठी खुपच मेहनत घेवून पारायणासाठी हा ग्रंथ उपलब्ध करुन दिला त्याबद्दल आम्ही त्यांचे खुप खुप आभारी आहोत. तसेच हा ग्रंथ प्रकाशन करण्यासाठी ज्या दात्यांनी आर्थिक मदत केली, त्यांचेही आम्ही आभारी आहोत. ह्या ग्रंथाची कमीत कमी व योग्यदरात छपाई करुन देणारे विजय ऑफसेटचे मालक श्री. विजयकुमार सुकलालसिंह परदेशी यांचेही आम्ही खुप खुप आभारी आहोत.

– धन्यवाद

अध्याय १ ला

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
श्री इमामशाह ज्ञानामृत । पूर्त झालासे ग्रंथ ।। तयाचा ऊत्तरार्ध । परिशिष्टाध्याय असे ।।२।।
पूर्व सूत्र धरुन । करीतसे लेखन ।। सद्गुरुंचे पंचमधाम । महत्त्व असे तयाचे ।।३।।
श्रीगुरुक्षेत्र कुमारीका । ऊत्तरेस असे देखा ।। तैसेच दक्षिणभागा । पंचमधाम फैजपूर ।।४।।
कोठे काय घडणार । तो नियतीचा अधिकार ।। पूर्व नियोजीतानुसार । असती तीयेचे संकेत ।।५।।
म्हणुन नियती म्हणती तीयेसी । अस्थिर वर्ते चंचलतेसी ।। यान्वये अशाश्वतासी । माया नाम ।।६।।
कोठे कुणी वसावे । काय कार्य करावे ।। हे नेमिले स्वभावे । पूर्व योजित नियतीने ।।७।।
नियतीचे ईच्छेपुढे । धर्म, न्याय, निती तोकडे ।। पाप पुण्याचे रहाट गाडे । स्तंभित होती ।।८।।
सर्व धर्म तेथे विरती । वाहणे प्रवाहावरती ।। जैसे ठेवी जगजेठी । तैसे रहावे धर्म जीवाचा ।।९।।
पुण्य घडे पापात्मक । पाप घडे पुण्यात्मक ।। सत्पंथी जरी गुरुमार्गी रत । ते पुण्य म्हणावे कीं पाप ।।१०।।
श्रीगुरु मार्गासी । आपुले कार्य रहाटती ।। तरी जन्मभूमी सोडीती । ईच्छा जाणा नियतीची ।।११।।
जेथे धर्म, निती, सत्य प्रबळ । वाटे कल्पनेचा खेळ ।। तेथ नितिमत्तेचा मेळ । तुडविला नियतीने ।।१२।।
कोठे धरावा विश्वास । दयाळू असे का परमेश ।। सत्या पाठी जगन्निवास । कैसा आहे म्हणावें ।।१३।।
बरळणे धर्म धर्म । वाटे दुबळे वर्तन ।। एका दु:खातून । समस्त सुखे वजा होती ।।१४।।
पावागडचे रहीवासी । वर्तती सत् मार्गासी ।। आवर्जून गुरुवचनासी । घटपाट पुजा करीती नित्य ।।१५।।
आणि अचानक । आली साडेसाती तयांस ।। बेगडाने जिंकीला प्रदेश । शनि पातला रयतेसी ।।१६।।
नेत्रांत आले पाणी । वंदीली मातृभुमि ।। आणि देशाटनी । सपरीवारे निघे प्रजा ।।१७।।

तेथीला लेवापाटील समाज । पातले मध्यप्रदेशांत ।। तैसे कांही खानदेशात । राहीले येऊन ।।१८।।
वंशोवंशी राहती तेथ । परी मूळ खानदेशस्थ ।। तयां ऊणे मानित । सत्पंथी म्हणुनी ।।१९।।
ना हिंदु ना यवन । ऐसे यांचे वर्तन ।। मूर्तीपुजा न मानी यवन । परी अथर्ववेद प्रमाण म्हणती ।।२०।।
धर्म दीसे विपरीत । पुजीती कलश पाट ।। अखंड घृतदीप । कोणता म्हणावे या धर्म ।।२१।।
या परी अनेक । मनी संशयाचे भूत ।। विवाह आदी कृत्य । वर्जीती तयांसी ।।२२।।
वने टाकीले वाळीत । कन्या त्यांच्या स्विकारीत ।। जरी वर्णील्या असत । तयांसी त्यजीती ।।२३।।
परित्यक्ता त्या दुःखित । माहेरी करीती वास ।। न्याय निती सोयर सुतक । नसे मूळ खानदेशियांसी ।।२४।।
परी महीचे महीमान । नित्य घडे नूतन ।। हाच तियेचा धर्म । शाश्वत कांही नसे ।।२५।।
जळगांव जिल्हा हरीत । काळी माती सुपिक ।। केळ्यांच्या बागा अमित । तेथील वांगी प्रसिध्द ।।२६।।
जलासम घृत । कणिदार प्रसिध्द ।। म्हणून जळगांवी तूप । सकस निर्भेळ ।।२७।।
पाडळसी ग्राम सान । सुखांत वसती जन ।। एका पंचासी कन्यारत्न । सीता नामक असे ।।२८।।
सीताबाईच्या विवाहास । वर केला नेमस्त ।। नाम डोंगर पाटील । राजोऱ्याचा रहीवासी ।।२९।।
कांही काल वर्तत । कन्येसी सीता प्रसवीत ।। कन्या लक्षण भाग्यकारक । नामकरण चमेली ।।३०।।
चमेली वाढे दीवसें दीवसी । मातापिता लाड पुरवी ।। सीता माता धार्मिकवृत्ती । संस्कार तैसे चमेलीवर ।।३१।।
सीताबाई साक्षर । गीता अध्याय पांच पाठ ।। ज्ञानेश्वरी एकनाथी भागवत । नित्य असे पठणी ।।३२।।
ज्ञानेश्वरांची सहीष्णुता । एकनाथांची नम्रता ।। श्रीकृष्णाची दुरदर्शता । त्रिवेणी संगम सीता असे ।।३३।।
चमेली येता वयात । घेती वराचा शोध ।। तुकाराम पाटील नेमस्थ । राजोरा ग्राम निवासी ।।३४।।
सीतेसी म्हणती ग्रामजन । करी स्थळ वर्जन ।। नका करु कन्यादान । पाटील असती सत्पंथी ।।३५।।

सत्पंथीयांचा आचार । असे निश्चित अघोर ।। जणु यवनांचे अवतार । गोमांस भक्षीती ।।३६।।
एक कृती एक ऊक्ती । ऐसी तयांची रीती ।। यवन हे हिंदु वेषी । मुख न पहावे प्रभाती ।।३७।।
निराकाराचे जपध्यान । इस्लामांचे लक्षण ।। शाह जो इमाम । त्यास म्हणती गुरु ।।३८।।
आले गुर्जर देशांतुन । म्हणती आमुचा धर्म ।। अनादी असे परम । जलयज्ञ आचरती ।।३९।।
निराकार निर्गुण । कैसे तयाचे पूजन ।। जैसे अंधारी करीती शोधन । कृष्ण मांजराचे ।।४०।।
तरी सांगतो हीत । सत्पंथीचा नसावा संबंध ।। हातचे सोडून पाठीस । पळणाऱ्याच्या लागु नये ।।४१।।
स्वतःस हिंदु म्हणवीती । इस्लाम आचार रीती ।। राखेखाली निश्चिती । अग्नी लपला असे ।।४२।।
जाणें जंव जलात । पादत्राणे काढणे इष्ट ।। नंतरचा पश्चात्ताप । निष्फळ असे ।।४३।।
वर्जाल आमुचे वच । वाळीत टाकू निश्चित ।। विचार करुनी इष्ट । मग मार्ग साधावा ।।४४।।
सीताबाई म्हणती तयांस । माझा विचार निश्चित ।। जरी पर्वता फुटले पंख । तरी निश्चय कायम ।।४५।।
जितके जीव असती । तितक्या असती मती ।। एका समान यष्टी । नसे दुसऱ्याची ।।४६।।
जया म्हणती धर्म । न कळे तयाचे वर्म ।। मूळ संस्कृती नाम । धर्म शब्द द्वापारीचा ।।४७।।
आचार आणि साधन । असे प्रत्येकाचे भिन्न ।। निर्गुण वा सगुण । दोन्ही रुपे ईश्वराची ।।४८।।
कोणी गावा । कोणी पुजावा ।। कोणी जपावा । ईश्वर प्राप्ती तत्त्व एक ।।४९।।
तरी किलिष्मे त्यजुन । धरावे सात्विक पण ।। निश्चय माझा परम । तुकाराम पाटील करीन जामात ।।५०।।
शुभ मुहूर्त पाहून । तुकाराम पाटीला केले कन्यादान ।। चमेलीचे पाठवण । केली राजोरा ग्रामासी ।।५१।।
जेथे सिध्द संकल्प । तेथे साक्ष भगवंत ।। निश्चयाचे बळ । सदा फलरुप होतसे ।।५२।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते प्रथमोध्याय: ।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय २ रा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्रीदत्तात्रेयाय नमः ॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ॥१॥
श्री तुकाराम पाटील । मुळचे कृषिक ॥ धुळे येथे शेतकी शाळेत । असती सेवारत ॥२॥
शेती असे ग्रामात । मिरची कपाशी पीके अमुप ॥ तैसी बागाईत । असे तयांची ॥३॥
कुटुंब एकत्रित । प्राप्ती असे अल्प ॥ प्रपंच्याचा शकट । ओढणे कठीण अती ॥४॥
म्हणून नौकरी सोडून । वास करीती स्वग्राम ॥ बंधुसहीत आपण । पिकविती शेती ॥५॥
सत्पंथ मार्गी आपण । इमामगुरुंचें स्मरण ॥ करीती आत्मज्योत ध्यान । घटपाट पुजा यथोचित ॥ ६ ॥
घरी धार्मिक संस्कार । असे शांती अपार ॥ तेथ कृपाळ ईश्वर । वसे जेथ समाधान ॥७॥
जैसे ईश्वर ठेविले । तैसे रहाणे भले ॥ चिंतेचे बंबाळे । नसे कदा तयांसी ॥८॥
ईश्वर रक्षक आपणा । असे ऐसी धारणा ॥ राजोरा ग्रामी निर्गुण । संकेत ईश्वराचा ॥९॥
पतीचे संगतीत । चमेली प्रपंच रत ॥ एकनाथा सम शांत । सर्वदा नम्र आप्तजनी ॥१०॥
वर्तता कांही दिवस । दोन अपत्ये झाली तीयेस ॥ परी नसे माहेरवास । रोष समाजाचा असे ॥११॥
तरीही मन शांत । सासर माहेर दोन्ही एकच ॥ जीव वर्ततसे जेथ । तैसा तो होतसे ॥१२॥
रंगावर ठेवीता स्फटीक । तया परी त्याचा वर्ण होत ॥ जन लाभता समाधानी शांत । ते आप्त आपुले जाणावे ॥१३॥
अनुसया आणि बळीराम । तैसा शिवराम ॥ ऐसी अपत्ये झाली तीन । पुन्हा वेध मातृत्वाचे ॥१४॥

पुन्हा भोगती गर्भारपण । शांत चित्त समाधान ।। तरी नित्य गृहकर्म । आनंदे करीत चमेली ।।१५।।

निसर्गाने आपुले कार्य केले । आपुले आपण करणे भले ।। गरोदरपणाचे चोजले । कदा न दाविती ।।१६।।

जंव न होय देहाकृती । तंव वरी डोहाळे नसती ।। जैसे मूल येणे जन्मासी । तैसे होती डोहाळे ।।१७।।

मूल जन्मणें तामस । माता भक्षी अती तिखट ।। होणार जरी रोगग्रस्त । अती ऊष्ण भक्षी माता ।।१८।।

भोजन अती क्षारयुक्त । नेत्ररोगी प्रसवे बालक ।। गर्भधारण होता दीवसास । राक्षस वृत्ती गर्भ ऊपजे ।।१९।।

व्यतीपातादी योगास । गर्भधारण संभव ।। बालक व्याधीग्रस्त । ऊपजे जन्मत: ।।२०।।

मूळ मघा रेवतीस ।होता गर्भधारणेसी ।। तया माता पित्यासी । बालक जन्मे अनिष्टता ।।२१।।

चमेली बाईस असता दीवस । स्वप्ने दिसती सूचक ।। वेळ ऊत्तम विशेष । असे ब्राम्ह मुहूर्ताची ।।२२।।

येत फुलांचा परिमल । कदां अश्व श्वेत ।। सुवासिनी सालंकृत । ऐरावत सप्तशुंडी ।।२३।।

शिवाचा नंदी ढवळा । कदा सिंह गर्जत आला ।। प्रकाशाच्या बंबाळा । कोटीसूर्य शीत प्रकाश ।।२४।।

वर्षाव चंद्रकलेतून । हीमाचल कनकवर्ण ।। सौभाग्यलंकार आभरण । दीसे सुवासीनी प्रौढ ।।२५।।

पंचफणीवर नागमणी । येती देवता जलातुनी ।। सुवर्णमय दीसे भूमी । वरी आसन स्वर्णयुक्त ।।२६।।

कल्पवृक्षा वरती । नाना वर्णे फुले दीसती ।। तैसी सौगंध व्याप्ती । येत नाद प्रणवाचा ।। २७।।

हर गौरीचे स्थान । तेथ असे गरुड वाहन ।। कण्वमुनी दर्शन । सुवर्ण मृग बागडती ।।२८।।

ॐ काराचे सगुण रुप । मांगल्यता ज्योती स्वरुप ।। ऐसी स्वप्ने एकवीस । सूचकता चमेलीसी ।।२९।।

एकांतता आवडे परम । सदा असती ध्यानमग्न ।। ऊघडे असती नयन । तरी प्रपंच दृश्य नसे ।।३०।।

दीवस दीवस वर्तता । देहा जाणवे अजडता ।। सर्व साक्षीभूतता । अलीप्तता वाटतसे ।।३१।।
मुनीवरांचे तपस्थान । तैसा दावी वास्तुगुण ।। आषाढमास लक्षुन । प्रवर्ते शुद्धपक्ष ।।३२।।
आली महाएकादशी । विष्णूसी वाहती तुलसी ।। प्रवर्ते आनंद वैष्णवक्षेत्री । पुरी जगन्नाथ विख्यात ।।३३।।
गुरुपौर्णिमा आषाढमासी । पुजा वेदव्यासांसी ।। याच दीवशीं ऋषींसी । दीधले दत्तात्रेये दर्शन ।।३४।।
ऐसा शुभ दीवस । चमेली प्रसवे पुत्रास ।। इसवी सन एकोणीसशें बेचाळीस । चार जुलै दिनांक ।।३५।।
बाळ दिसे सुलक्षण । ओजस्वी परम ।। अदृश्यें आशिर्वदती इमाम । कार्य प्रणेता पंथाचा ।।३६।।
पांचवीचा होता दिवस । अरुणवर्ण वसन स्त्री येत ।। बालकावर फिरवुनी हात । ज्योतीत अदृश्य होतसे ।।३७।।
ती प्रत्यक्ष सटवाई । बालका आशिष देण्या येई ।। दीग्मुढ होऊनी पाही । चमेली माता ।।३८।।
बारशाचे दिवशी । जयराम ठेविले अभिधानेसी ।। आनंद न समाये मानसी । नवल ऊदेला चंडाशु ।।३९।।
सत्पंथाचे ऊध्दरणासी । नियतीने नेमिले जयरामासी ।। परी कल्पना नसे कोणासी । भविष्ये काय नेमिले ।।४०।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते द्वीतीयोध्यायः ।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय ३ रा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
गताध्यायीचे कथन । जाहला जयरामचा जन्म ।। मग चमेलीस बालके तीन । नामे मनोहर, मुरलीधर, पंडीत ।।२।।
संसार मध्यम परीस्थीतीत । परी कुटुंब सुखात ।। ईश्वरावरी ठेऊनी भाव । आनंदे राहती ।।३।।
सहावे वयास । शाळेत पाठविती जयरामास ।। तीव्र बुध्दी जन्मजात । त्वरीत होई आकलन ।।४।।
आजीचे नांव गोपिका । नातवांसी सांगे कथा ।। ध्रुव, प्रल्हाद पांडवादीका । कैसा प्रसन्न तयां नारायण ।।५।।
मातामही कडून करारीपण । पीतामही शिकवी जीवनमूल्य रक्षण ।। याचा परिणाम । जयरामावर त्वरीत होई ।।६।।
सवंगड्यांचे संगती । पोहण्याची आवड अती ।। आनंदे प्रवाह वळवी । डरफोळया ओढ्याचा ।।७।।
परी विंचू सर्पादी विखार । त्वरीत येती बाहेर ।। मग थांबवी खेळ अघोर । ओढ्यातील गाळ काढी ।।८।।
ऐसे एकदा ओढा तीरावरुन । जातसे पहाण्या ऊगम ।। लागे माणकेश्वर स्थान । वंदुनी शिवा परतला ।।९।।
आवड अती संगीताची । भक्तीगीते भावती मनासी ।। हरिश्चंद्र चिलया आख्यानासी । श्रवता मुग्ध होतसे ।।१०।।
जयराम असतां पांचवीत । फर्दापूरला गेली सहल ।। निर्विकार शांत रुप । पाहीले शिल्प बुध्दाचे ।।११।।
तेव्हापासून तयास । विश्वात्मकाचा लागला ध्यास ।। येतां अश्वत्थ तळवटीस । अंतर्मग्न होतसे ।।१२।।
स्थावर जंगमी विचित्रता । नसे कवण एकता ।। ईश्वराची निर्माणता । करी विचार अंतरी ।।१३।।
निराकाराने निर्मिले । परी ते सगुण देखिले ।। जड अजडी चैतन्य विहरे । सर्व व्यापक सर्वेश्वर ।।१४।।
तयाचा घेण्या शोध । होतसे मन विचल ।। एकाग्रता हाची मार्ग । जाण आली जयरामा ।।१५।।
सन एकोणीसशें एक्कावनात । दोन वर्षे होता अकाल ।। आपुली शिदोरी सर्वांस वाटून । मग आपण सेवितसे ।।१६।।

realpatidar.com

भागविणे परक्षुधा । हीच ईश्वर सेवा ।। दया समस्त भूतमात्रा । जन्मठेव जयरामाने आणिली ।।१७।।

एकदां तुकाराम पाटील । आले बाजारा फैजपुरांत ।। तेथे सत्पंथ मंदीरात । घेती दर्शन पुरुषोत्तम गुरुंचे ।।१८।।

दोघांचे संवादात । होते कांही तथ्य ।। करुनी कांही संकेत । परतले राजोऱ्यासी ।।१९।।

पाची पुत्रांस पाचारुन । म्हणती ऐका माझे वचन ।। सत्पंथ मंदीरा करणे अर्पण । तुम्हांतील एकासी ।।२०।।

पाची मुले माझी प्रजा । घडावी सेवा अधोक्षजा ।। द्यावी एका हाती धर्मध्वजा । ऐसे असे मानस ।।२१।।

बळीराम देई नकार स्पष्ट । मनोहर, मुरलीधर, पंडीत ।। सांगती पित्यास । बुवा महाराज आम्हां न होणे ।।२२।।

ईश्वरे दीधला मानवजन्म । त्याचे सौख्य भोगावे परम ।। चारी आश्रमी गृहस्थाश्रम । ऊत्तम सांगती शास्त्रे ।।२३।।

देवतांचे अवतार । जरी जाहले धरेवर ।। त्यांनीही मांडला स्त्री संसार । भोग भोगले धरेचे ।।२४।।

ऋषि जरी तपोधन । तरी आचरती गृहस्थाश्रम ।। तयांही होते संतान । तरीही साधती मोक्ष ।।२५।।

ऋषिंची वंशवेल । ऋषि तयांचे गोत्र ।। गृहस्थाश्रमी सौख्य । ते कां त्यजावे मुढपणे ।।२६।।

ब्रम्हचारी गृहस्थाश्रम । साधावें वये करुन ।। पुत्रासी समस्त अर्पून । मग वानप्रस्थाश्रमी व्हावे ।।२७।।

या कलीयुगांत । सन्यास ना विधीवत ।।तैसे ब्रम्हचर्य कलीवर्जीत । सुरीवचन अवलोकावे ।।२८।।

ऊध्दरणें वंशास । तृप्त करावे पितरांस ।। जीवन म्हणावे यास । भोगुनी सुखे जावें स्वर्गी ।।२९।।

जनक आणि दशरथ । भोगती राज्य स्त्री सुख ।। मग काय ते वंचित । झाले स्वर्गापासूनी ।।३०।।

सन्याशाचा देह । असे प्रेतवत ।। म्हणूनी कदां स्पर्श । न करावा सन्याशासी ।।३१।।

या कारणे ताता । सोडा विचार वृथा ।। पुत्र अर्पिणे मठा । काय लाभ तुम्हांसी ।।३२।।

मग बोले जयराम । करा मज मठार्पण ।। गुरु सेवा असे महान । ते पूजन ईश्वराचे ।।३३।।

जन्मुनी भूमीवर । साधावा धर्माचार ।। करावा सत्पंथ ऊध्दार । मलीन जाहला जनरोषे ।।३४।।

करावे ईश्वराधन । या कारणे मानव जन्म ।। सर्व संसारी रत होऊन । कोणी करावा धर्माश्रय ।।३५।।
तुकाराम पुसती पत्नीसी । काय तुझे मानसी ।। जयराम अर्पिणे मठासी । ऐसी मम ईच्छा ।।३६।।
रुकार दीधला तियेने । मातेस पुसते पत्नी म्हणे ।। सीताबाईस कथन । करीती झाली आद्यंत ।।३७।।
माता म्हणे चमेलीसी । अवश्य अर्पावे जयरामासी ।। धर्मोध्दार कारणासी । असे जन्म तयाचा ।।३८।।
तो असतां गर्भात । एकवीस स्वप्ने पाहीलीस ।। ते शुभाचे संकेत । धर्मोध्दारक पुत्र म्हणोनी ।।३९।।
गुरुपौर्णिमेचा जन्म । हीच गुरुरुपाची खूण ।। अशाश्वताचा ध्यास सोडून । शाश्वत मार्ग आचरावा ।।४०।।
अज्ञानी जन । विविध मार्गे संपादीती धन ।। आपुल्या वंशजाकारण । रक्षु म्हणती संपदा ।।४१।।
परी संपदा अशाश्वत । कदां न राहे चौथ्या पिढीस ।। धनिकांचे वंशज । विध्वंसक निपजती ।।४२।।
अधर्म त्यांचा धर्म । मनमाने वर्तन ।। अखेर हतबध्द होऊन । प्रवाही वाहणे धर्म त्यांचा ।।४३।।
कोणी घेता दीक्षा सन्यास । तयाच्या तीन पिढ्यात ।। सौख्य संपदा भोगिती वंशज । नियम हा नियंत्याचा ।।४४।।
तरी मनीचे कीलीष्म त्यजून । मठा अर्पी जयराम ।। वंश ऊध्दाराचे संकेतन । जाण ईश्वराचे ।।४५।।
चमेली तव थोर भाग्य । मठपती तया पाचारीत ।। सत्पंथाची पुरोगामी ज्योत । असे जयराम ।।४६।।
कोणीही कांहीं म्हणोत । करतील बुध्दी भेद ।। तरी स्थिर ठेवी निर्णय । सीताबाई सांगती चमेलीसी ।।४७।।
सत्पंथाच्या वेलीवर । ऊमले नवीन फूल ।। अज्ञान्यांची भूल । अखेर भूलची ठरली ।।४८।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते तृतियोध्याय:।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय ४ था

ॐ परमात्मने नमः ।। श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ नमः श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
एकदा राजोरे ग्रामात । श्रावणमासा निमित्त ।। पोथी वाचन प्रबंध । होता दीपचंद महाजनांचे घरी ।।२।।
प्रथम पासून जयरामास । श्रवण मननाची आवड ।। आपुल्या मित्रां समवेत । श्रवणास नित्य येती ।।३।।
देवराम पाटील । पोथी सांगती सार्थ ।। जयराम पुसे तयांस । सर्वात श्रेष्ठ देव कोण ।।४।।
देवराम झाले स्तंभित । कोण्या देवा द्यावे श्रेष्ठत्व ।। प्रत्येकाचे सामर्थ्य । दीसे स्पष्टपणे ।।५।।
कोण श्रेष्ठ । कोण कनिष्ठ ।। ज्याचे त्या विशेषत्व । पोथीनुरुप असे ।।६।।
ज्या देवाची जी पोथी । ती देवता श्रेष्ठ म्हणती ।। इतर देवतांसी गौणस्थिती । कैसा करावा निर्णय ।।७।।
पुराणे असती विविध । नसे त्यांत एकमत ।। पुराणी दैवत नियुक्त । ते श्रेष्ठ म्हणती ।।८।।
परी सर्व पुराणी एकमत । आद्य पुजन न कथीले कोणास ।। जरी दीधले श्रेष्ठत्व । तरी जेष्ठत्व दीले नसे ।।९।।
विचार करी जयराम । जयाने अवतरुन ।। निचांचे करुनी निर्दलण । रक्षण केले सृष्टांचे ।।१०।।
ती देवता नारायण । कार्यार्थे अवतरुन ।। वेद संस्कृती रक्षुन । ग्लानी निरसवी धर्माची ।।११।।
तो विष्णू नारायण । असे श्रेष्ठ परम ।। संतांचे ऐसे वचन । सर्व विष्णूमय जगत ।।१२।।
ऐसा तो निर्णय । मान्य सर्वथा होय ।। ॐ नमो भगवते वासुदेवाय । हेची एक परम सत्य ।।१३।।
तो एकची नारायण । करी सर्वांचे पालन ।। निष्कलंकी आपण । इमाम गुरुंचे वच सत्य ।।१४।।
ऋषींची मतांतरे विविध । स्विकारावे जे इष्ट ।। भगवान ऐसे गीतेत । कथिती अर्जुनासी ।।१५।।
फैजपूरचे मठपती । पुरुषोत्तम गुरु सत्पंथी ।। आले जयराम गृहासी । पिढी ऊटासन पूजे प्रित्यर्थ ।।१६।।

गुरुंचे होता दर्शन । आकर्षिले जयराम मन ।। अती आदरे वंदन । केले तयांसी ।।१७।।
अंतरीचा नारायण । सांगे तुझे हे गुरु परम ।। संवेद्य शलाका एकपण । जाहले तेथेची ।।१८।।
प्रथम गुरुंचे दर्शन । जाहला विशेष परिणाम ।। जन्मांतरीचे आप्तपण । जाणीवा आले ।।१९।।
जाणावा आत्म्याचा हूंकार । ते सत्य प्रबळ ।। स्मृती ब्रह्माचा ऊन्माळ । जन्मांतरीचे संवेदन ।।२०।।
चक्र जे मूलाधार । ते जन्मांतरी स्मृतींचे घर ।। परातीत ईश्वर । जागवे तयांसी ।।२१।।
परी ते होण्या श्रवण । असावे जागृत अंतर्मन ।। संवेद्य संकेतन । तेंव्हा जाणवे ।।२२।।
मना मनासी होता ओढ । प्रापंचिकता राहे स्तब्ध ।। भंवतीचा शक्तीवृंद । त्वरीत दूर होतसे ।।२३।।
आनंदे होऊनी विभोर । जयराम सांगे पित्यास ।। फैजपूर सत्पंथी मंदीरास । मज अर्पण करावे ।।२४।।
तुकाराम पाटील म्हणती । आधी जावे मंदीरासी ।। जाणून घेई कार्यासी । जे नित्य होतसे ।।२५।।
कांही दीवस राहून । करी कार्य संपादन ।। होऊ वाटेल अंगीकरण । तरच अर्पिन तुज ।।२६।।
वय तुझे सान । मठ नियमीतता अभिज्ञ ।। सर्वकाळ सेवाधर्म । नियोजीत काळी करणे लगे ।।२७।।
केवळ होऊनी भावनावश । न करावे साहस ।। विचार मंथनी निर्णयास । आकळणे बरे ।।२८।।
नको केवळ तडजोड । ती असे घातक ।। तडजोड म्हणजे अनिर्णित । असे निर्णय ।।२९।।
गंगा गये गंगादास । गये जमना जमनादास ।। ऐशा मनोवृत्तीस । कदां न स्विकारावे ।।३०।।
सोपा नसे सेवाधर्म । सहज परी कठीण ।। पर्वतावरी हरित वन । परी मूळी कंटक ।।३१।।
वय तुझे द्वादश । करी सखोल विचारास ।। केलेल्या दानास । पुन्हां न ये स्विकारीता ।।३२।।
जयराम म्हणे ताता । वृथा न करावी चिंता ।। ध्यास मज लागे आता । फैजपूर मंदीरा जाण्यासी ।।३३।।
जाहले गुरुंचे दर्शन । आनंदाचे झाले वर्षण ।। मज नूतन जन्म । जाहला ऐसे वाटतसे ।।३४।।

सेवा गुरूंची करुन । तयांसी तोषवीन ।। कदां आज्ञा लंघन । न करीन तयांचे ।।३५।।
नारायणाची सेवा करीता । येईल जन्मा सार्थकता ।। धर्मावरील मलीनता । दूर करीन ।।३६।।
पीता म्हणे तयासी । जैसे तव मानसी ।। आनंदे अर्पिन तुजसी । मंदीरी फैजपुरी ।।३७।।
पाहुनी शुभलग्न शुभतीथी । जयरामा अभ्यंग घालीती ।। ऊपचारे पुजा करीती । धर्मवेत्ता म्हणुनी ।।३८।।
भात, दुध, गुळ युक्त । त्यांत फळे पक्व ।। ऐसा कोरा प्रसाद । सर्वांसी वाटती ।।३९।
आप्त इष्ट स्त्रीयांचे नेत्री । अश्रु पाझरती ।। आनंद की दुःख यासी । काय द्यावे नाम ।।४०।।
ऊर येई भरुन । येई कंठ भरुन ।। पदांचेही हरे त्राण । विचाराही स्तंभनता ।।४१।।
तुटणार नाते संबध । आपुला परांचा होत ।। वृत्तींचा सरे ओघ । आपुले भोग म्हणती ।।४२।।
आली बैलगाडी दारांत । पिता पुत्र बैसले समस्त ।। बैल मार्ग आक्रमीत । आप्तइष्ट दूर होती ।।४३।।
चालत्या गाडीत । मौन सामावे मौनात ।। सरला काल भूत । वेध घेती भविष्याचा ।।४४।।
बैल धावती दुडदुड । अंतरी असे धडधड ।। घुंगरांचा नाद । तयास साथ देई ।।४५।।
लंघीली सीमा राजोऱ्याची । वाट पळे फैजपुराची ।। आणि दीसे तयांसी । सत्पंथी मंदीर ।।४६।।
मंदीर आणि पाकघर । तैसा अल्पसा चौक ।। एवढाच होता विस्तार । त्या वेळी मंदीराचा ।।४७।।
पाहतां पाटील पुत्रांसहीत । आले पुरुषोत्तम महाराज ।। आदरे समस्तांस । नेती मंदीरी ।।४८।।
मुद्रा लाऊनी भूचरी । महाराजा जयराम नमस्कारी ।। वस्त्र लाऊनी नेत्री । वदते झाले पाटील ।।४९।।
माझा पुत्र जयराम । करीतसे मंदीरा अर्पण ।। माझे आहेत पंचप्राण । त्यांतील एक अर्पितो आपणा ।।५०।।
आहे वय सान । नसे व्यवहारी पुरतेपण ।। तरी तया सांभाळून । आपण घ्यावे ।।५१।।
आतापर्यंत आप्तांत । बागडत होता पुत्र ।। आता जाहला एकाक । आपण सर्वस्व तयाचे ।।५२।।

तुम्हीच त्याचे मातापिता । तुम्हीच रक्षीता ।। माझ्या काळीजाचा तुकडा । वाहीला तुम्हांपदी ।।५३।।
आपुले जे ऋण । ते येथे फेडणे ।। जन्मांतरीचे देणे घेणे । ऐसे असे ।।५४।।
बोधीती जयरामासी । पिता जाण महाराजांसी ।। वर्तावे तयां आज्ञेसरसी । कदा नको दुखवु ।।५५।।
माणूस असतां विवंचनेत । चिडखोर होत स्वभाव ।। अनावधाने बोलते वक्र । तरी मनावर घेऊ नये ।।५६।।
चिंताग्रस्त असतां आपण । जग दिसे चिंतायमान ।। रागाचा ऐसा गुण । अन्यत्र प्रकट होतसे ।।५७।।
राग असे जयावर । तो राहतसे दूर ।। आणि इतरांवर । भडका तयाचा होतसे ।।५८।।
विनविती महाराजांसी । कदां स्मृती तया घरची ।। चार दिवस राजोऱ्यासी । आपण कृपया धाडावे ।।५९।।
भरुन आणिला कलश । आता रिता नेत ।। चेतन जल तयांत । ते आपुल्या पदीं वाहीले ।।६०।।
आला हूंदका कंठात । मंदीराकडे फीरवीती पाठ ।। पाटील बैलगाडीत । जड पाऊले बैसले ।।६१।।
गाडी निघाली राजोऱ्यास । सरे फैजपूर हद्द ।। मौन समस्त सृष्टीत । गारवा आणि निद्रा ।।६२।।
या परी जयरामास । अर्पिले सत्पंथास ।। नियतीचा संकेत विचित्र । तेथे मानव हतबल ।।६३।।
आपुले जीवन । असे सदा पराधीन ।। याची जाणीव खुण । दिसे यापरी ।।६४।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते चतुर्थोध्याय :।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय ५ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
आला जयराम मंदीरात । आप्त इष्टांच्या स्मृती होत ।। सर्व हृदयीं सामावत । परी नांव न घेई घराचे ।।२।।
भूतकाळाचे नको स्मरण । जो गेला निघून ।। करूनी तयाची आठवण । भूतकाळ न ये वर्तमानी ।।३।।
जो गेला निघून । त्यजावी त्याची आठवण । भूत भविष्य विसरून । असावे स्थित वर्तमानात ।।४।।
भूतकाळ स्मरणें दुःख होते । भविष्य खेळे मनोराज्याते ।। म्हणून सोडावे दोघांते । वर्तमान ऊत्तम स्थिती ।। ५।।
पुरुषोत्तम महाराज । ज्या परी वर्तत ।। ते सर्व आत्मसात । जयराम करीतसे ।।६।।
गोमये मंदीर सारवण । स्वयंपाक रांधण ।। भांड्यांचे मार्जन । स्वच्छ करणे मंदीरासी ।।७।।
ऊठोनी ब्राह्ममुहूर्तास । गुरु स्नाना करी तप्त जल ।। तयांचे स्नानानंतर । आपण स्नान करीतसे ।।८।।
इतर कार्यास्तव पाणी । विहीरीतून ओढूनी ।। ठेवी हौद भरूनी । स्वयंपाका जल नंतर ।।९।।
श्री गुरुंची वस्त्रादीक । धुवुनी करी स्वच्छ ।। मग त्वरे स्वयंपाकादीक । करी आनंदे ।।१०।।
प्रातः सायं पुजारती । करीतसे तयारी ।। मंदीरी येणाऱ्यांची सरबरी । नम्रत्वे करीतसे ।।११।।
यावल वा जळगांवात । न्यायालयी जाणे अगत्य ।। जेऊनी जाती महाराज । म्हणुनी स्वयंपाक रामप्रहरी ।।१२।।
जयरामाची नम्रता । तैसी सेवा तत्परता ।। आनंद महाराजांचे चित्ता । सेवा कर्तव्य पाहूनी ।।१३।।
फैजपूरी शाळेत । इयत्ता सातवीत ।। केले दाखल जयरामास । पुरुषोत्तम गुरुंनी ।।१४।।
शाळा आणि अभ्यास । मंदीरी सेवाव्रत ।। ऐसे कडक तप । आचरी जयराम ।।१५।।

असतां आठवी इयत्तेत । तुकाराम पाटलांचा पुत्र ।। म्हणुनी अर्धमाफ । शुल्क जाहले ।।१६।।
कदां शुल्क नसे धन । तेव्हा इंगळे शिक्षक आपण ।। स्वत:जवळचे धन । भरती शुल्क म्हणोनी ।।१७।।
मंदीरी सेवेस आला जयराम । चौधरी मुख्याध्यापका जाहली जाण । तेव्हा शुल्क संपूर्ण । माफ केले तयांनी ।।१८।।
इसवी सन एकोणीसशें एकोणसाठांत । द्वितीय परिक्षा शालांत ।। जयराम ऊत्तिर्ण होत । मॅट्रीक म्हणती ।।१९।।
त्यावेळी महाविद्यालय । होते जळगांवात ।। तेथे जाणे अशक्य । नसे पैसा पुरेसा ।।२०।।
संस्कृत शिक्षणास । जावे वाटे वाराणसीस ।। अंतर पडेल मंदीर सेवेस । घातली मुरड मनासी ।।२१।।
शिकण्यासी ज्योतिषशास्त्र । जावे वाटे पुण्यास ।। परी बलत्व । नसे तया ग्रहांचे ।।२२।।
धनाजीनाना महाविद्यालय । सन एकोणीसशें एकसष्टांत ।। झाले सुरु फैजपूरात । मन ओढे जयरामाचे ।।२३।।
महाराजांसी कळता मत । बोधीती जयरामास ।। जाऊनी महाविद्यालयात । मिळेल पदवी तुजसी ।।२४।।
अरे ऐशा पदव्या महान । भिंतीचे होती भूषण ।। देणार घेणार दोघेजण । असती मानव ।।२५।।
अरे ऐशा शिक्षणासी । ऊपयोग काय मंदीरासी ।। शिक्षण जे सत्पंथी । ती पदवी मेळविजे ।।२६।।
इमाम गुरुंचे ज्ञान सत्य । कदां न लाभे महाविद्यालयांत ।। पदवीत पदवी ज्ञान श्रेष्ठ । जाणून घेईजे ।।२७।।
ऐसे ज्ञानवंत नरासी । लोटांगण घाली सरस्वती ।। तेथे शालेय ज्ञानियांची दृष्टी । पडे तोकडी ।।२८।।
आपुल्या मंदीरांत । इमाम गुरुंचे आहेत ग्रंथ ।। करी त्यांचा अभ्यास । इमामशाह करतील कृपा ।।२९।।
भूमी असे पवित्र । इमामगुरुंचा नित्य वास ।। तयांनी कथिले या स्थानास । पंचमस्थान आपुले ।।३०।।
श्री गुरु इमामशाह । आले होते खानदेशात ।। या स्थानी फैजपूरात । कांही काळ वास केला ।।३१।।
भक्तांसवे येथे बसून । केले वेदांचे विवरण ।। सत्पंथाची शिकवण । येथे दीधली भक्तांसी ।।३२।।

घटपाट पुजा घडे येथ । प्रज्वलीती घृत ज्योत ।। आमुचे पंचमस्थान हेच । स्वयं कथिले गुरुंनी ।।३३।।
तयांचे वच सत्य । तयांचे धामी तयांचा वास ।। अनुभव येईल तुज । नित्य जागृत इमामशाह ।।३४।।
तयांच्या भाकीता नंतर । पांचशें लोटले संवत्सर ।। आणि जाहले प्रकट । श्रीगुरुंचे पंचमस्थान ।।३५।।
ते तुझे मार्गदर्शक । तयांचे साहित्याचा होईल बोध ।। आज जरी दीसे झांकळ । भविष्यांत दीसेल ओजस्विता ।।३६।।
पुढले भविष्य जाणून । निर्मिले पंचम स्थान ।। क्षेत्र पिराणा न ये घडून । त्याने यावे फैजपूरा ।।३७।।
पंचमस्थान पंचारती । पंचविधा ज्ञानप्राप्ती ।। स्थानाची महती । येईल अनुभवा ।।३८।।
नंदीने पुशिले शिवासी । प्रश्न मानव हीतासी ।। शिवे दीधले ऊत्तरांसी । इमामशाहांसी जाहले आकलन ।।३९।।
इमामशाहांनी स्वयंस्फूर्त । केली प्रश्नावली निर्मित ।। ती नंदीकेश्वर प्रश्नावली येथ । रक्षीली असे ।।४०।।
ऊत्तर दक्षिण दिशेस । असती गंगा कैलास ।। गोकर्ण दक्षिण कैलास । दक्षिण गंगा गोदावरी ।।४१।।
श्री इमामशाह कृपेस । खानदेशी धान्य घृत अमाप ।। दक्षिणचे कुमारिका क्षेत्र । फैजपूर जाणावे ।।४२।।
जितके महत्त्व षड्जासी । त्याहुन अधिक पंचमासी ।। न लागता पंचमासी । ना ऊमटे गंधार ।।४३।।
पंचमाची महता । घेई जाणूनी आता ।। पंचम भूत वायु नसता । जीवा जगणे अशक्य ।।४४।।
या स्थानाची जागृतता । घेई जाणून आता ।। एकदा अकाल पडता । जाहली दशा अन्नान्न ।।४५।।
तंव कोणी महंत । आले मंदीरात ।। आणि सुमनांचा वर्षाव । जाहला असे ।।४६।।
ती सुगंधी सुमने । जने ठेविली पुजेत ।। म्हणती महात्मा अदृश्ये । आले मंदीरी दर्शना ।।४७।।
ते महंत महान । पिठाधिशा बोलती वचन ।। यथोचित करविती पूजन । पाट कलशाचे ।।४८।।
समंत्रे करीता पूजन । इंद्र देवता आणि वरुण ।। ऊद्भवुनी कलशांतून । स्विकारिती पूजनासी ।।४९।।

आणि आशिर्वचून । पावल्या देवता अंतर्धान ।। आले जलमेघ दाटून । वर्षा जाहली अमूप ।।५०।।
सांग आतां जयराम । ते महंत असती कोण ।। गुरुंचे पंचमस्थान म्हणून । आले होते हाजरबेग ।।५१।।
जेथ हाजरबेगांचे आगमन। तेथ गुरूंचे वसतीस्थान ।। पंचमधाम महीमान। फैजपूर क्षेत्र असे ।।५२।।
श्री गुरूंचे ग्रंथ अमोघ। करी तयांचा अभ्यास ।। श्री इमामगुरु प्रत्यक्ष । सहाय्यभूत तूज होतील ।।५३।।
श्रवतां पंचम स्थान वैभव। ऊमटले जयरामाचे अष्टभाव ।। म्हणें माझे भाग्य थोरा दैवे आणिले यास्थानी ।।५४।।
जो सत्य अभ्यास । जाणीला तयाचा आस ।। हेची एक सत्य । शेष ती भ्रमावस्था ।।५५।।
द्यावा मज आशीर्वाद । शब्दा पुढे धावावा अर्थ ।। जाणून यावे मूळतत्त्व । गृहीत गुढार्थ गुरुकृपे ।।५६।।
जैसे इमामगुरूंचे मत । तैसा लागावा अर्थ ।। सत्पंथाचे संकेत । सूक्ष्म ज्ञान व्हावी जाण ।।५७।।
नसावा वाच्यार्थ लक्षार्थ । जाणून येवो रहस्यार्थ ।। त्यांतून ऊमटो गुढार्थ । श्री इमामगुरु कृपे ।।५८।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते पंचमोध्याय :।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय ६ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।

ऐकता महाराजांचे वच । विचार वावटळे झाली नष्ट ।। एकची घेतला ध्यास । सत्पंथ ग्रंथ अभ्यासिणे ।।२।।

भजनावली, पूजामंत्र । सत्पंथ ज्ञान साहित्य ।। श्रीमद्‌दशावतार । पूनर्लेखन आरंभीले ।।३।।

अक्षरे सुंदर गोलक । जैसी मौक्तिक माळ ।। शब्दांचा इष्टार्थ प्रबळ । सांठवे अंतरी जयराम ।।४।।

मंदीराची सेवा यथोचित । अभ्यास काळे ऊर्वरीत ।। आळस तंद्रा कदा न होत । असे प्रसन्न सर्वकाळी ।।५।।

ऐसे संवत्सर पांच सात । आपुल्या कार्यी असे रत ।। नंदीकेश्वर प्रश्नावली पहाण्यास । शकुन पहाण्या जन येती ।।६।।

तयांची ऊत्तरे यथोचित । जयराम जना सांगत ।। प्रश्नांचे निश्चित अर्थ । महाराष्ट्र भाषे सांगतसे ।।७।।

कल्पकता जन्मजात । होती अवगत जयरामास ।। सांगे ते मान्यवंत । जनांसी होतसे ।।८।।

मंत्रांचे अर्थ । जनांसी समजावीत ।। मंत्र म्हणणे मनांत । जयरामा मान्य नसे ।।९।।

सप्तशतीचे मंत्र । कदां न म्हणावे मनांत ।। आपणा व्हावे श्रृत । परी मध्यमे म्हणावे ।।१०।।

हीच मंत्रोच्चार पध्दत । जयराम स्विकारीत ।। म्हणुन आदर जनमानसात । तया विषई होतसे ।।११।।

आठवड्यातून एक दोन वेळ । पूजा कार्या निमित्त ।। जाणे लागे परगावांस । संपादी यथोचित कार्य ।।१२।।

पुण्यतिथी, कसणी, दसवंत । गृहशांती, सुक्रित ।। पिढी ऊटासन, मानित । ऊटासनादी कर्मे ।।१३।।

ऐशा पुजांचे ऊद्देश । फलश्रृती आणि अर्थ ।। समजावीती जनांस । तये श्रध्दाळू होती जन ।।१४।।

कवण कर्मा कवण फळ । दुर्योग टळती कैसे अटळ ।। कर्मानुरुप कैसे फळ । देतसे नारायण ।।१५।।

पूजांचे जाणता अर्थ । बहू जन येती मंदीरात ।। दानधर्मादी दसवंत । वर्धन होत असे ।।१६।।

जयरामाचा पायगुण । सत्पंथा मानू लागले जन ।। जुन्या मंत्रा मूलामा नूतन । होतसे जनजागृता ।।१७।।
गांवोगांवीचे नवीन लोक । येती मंदीरी दर्शनास ।। यथोचित करुनी स्वागत । होतसे धर्मचर्चा ।।१८।।
सगुणोपासना निषेध । कधी न करी जयराम ।। इमामशाहांचे वचन । पाणि पत्थर पुजवू नही ।।१९।।
या वचनाचे मर्म । सांगे जना समजाऊन ।। प्रतिके केवळ गृहीत धरुन । नारायण जाणावा ।।२०।।
प्रतिके नोहेत परमेश्वर । मन एकाग्रतेसी आधार ।। ऐसा करुनी विचार । आहारी न जावे सगुणाच्या ।।२१।।
जितके असती आकार । तितके येती विचार ।। करण्या तयांचा प्रतिकार । मनास होई अवघड ।।२२।।
गारोड्याच्या खेळांत । दोरी दिसे सर्प सत्य ।। ऐसीच असे गत । अज्ञान भजकांची ।।२३।।
तूची आत्मा साक्षात । ऐसा सांगे अथर्ववेद ।। आत्मा असे ज्योतीस्वरुप । बाह्यरुप घृतज्योती ।।२४।।
तीयेचे करावे ध्यान । अंतर घेई तया वेधून ।। यथाकाले दर्शन । आत्मज्योतीचे होईल ।।२५।।
बंध मोक्षासी कारण । आपुलेच असे मन ।। ऐसे श्रीकृष्ण भगवान । सांगती गीतेमाजी ।।२६।।
मनोवृत्ती लाटांत । मनोनौका हेलकावत ।। विचार सागर होण्या शांत । जप ॐ कार ऊत्तम ।।२७।।
प्रणव जप ज्योती ध्यान । निरुपाधिक साधन ।। देह मंदीरी वसे नारायण । ध्यानसेतू दर्शनासी ।।२८।।
सत्पंथाचे महत्त्व । करी जना विशद ।। तयाने अज्ञानी नास्तिक । झाले भाविक श्रध्दाळू ।।२९।।
जयरामाची प्रसिध्दी । होई जनमानसात ।। दूर गावचे लोक । येऊ लागले मंदीरा ।।३०।।
सत्पंथ प्रणीत । वाढल्या पूजा मंदीरात ।। साकडे घालण्या देवास । कित्येक येती ।।३१।।
कोणी करीती नवस । कोणी फेडीती मानीत ।। रमल विद्या निष्णात । ख्याती ऐसी जयरामाची ।।३२।।
गांवोगांवीचे लोक । आले फैजपूर मंदीरात ।। चर्चासत्रे धार्मिक । जाहली सत्पंथाची ।।३३।।
जयराम समस्तांस । दावी प्रमाण सिध्द ।। जे ज्यांचे मनात । फेडी त्यांचे संशय ।।३४।।

पाहूनी ऐसी बुध्दी तीव्र । येई जन मनांत ।। सांभाळील हा गुरुपद । सखोल पंथज्ञान ।।३५।।
सत्पंथाचे तत्त्व । यास ज्ञान ऊचित ।। संशय जे जनमनात । निःसंशय निवारील ।।।३६।।
जमुनी सर्व भक्त । केली सभा आयोजीत ।। आणि आपुला हेत । निवेदीती पुरुषोत्तम महाराजांसी ।।३७।।
मंदीर सेवक जयराम । दीक्षा योग्य वाटे आम्हा ।। तरी दीक्षा देऊनी त्यांना । ऊत्तराधिकारी करावे नियुक्त ।।३८।।
सर्वानुमते संमत । निर्णय झाला निश्चित ।। गुरुपोर्णिमा दिवस शुभ । दिक्षादानासी योजीला ।।३९।।
सत्तावीस जूलै दिनांक । सन एकोणीसशें बासष्ट ।। दिक्षा विधी यथाविध । मोठा ऊत्सव झालासे ।।४०।।
विष्णू दिक्षीत पुरोहित । तया हस्ते संपन्न विष्णूयाग ।। जन आले सहस्त्रविध । पाहण्या समारंभ ।।४१।।
भगवी वस्त्रे अर्पून । दिधला गुरुत्वाचा मान ।। गायत्री नारायण । जाहले पुरश्चरण ।।४२।।
सरला पूर्व जन्म । गुरुदिक्षा जन्म नूतन ।। नवा जन्म, नवे नाम । नाम जयराम अस्त पावे ।।४३।।
जगन्नाथ गुरु पुरुषोत्तम । ऐसे जाहले दीक्षा नाम ।। पूर्व आप्तांचे केवळ स्मरण । पूर्व देहाचे संबंध ।।४४।।
भगवी वस्त्रे प्रावरण । दीप्ती पावे महान ।। तेज ऊफाळले आंतून । बाह्य मंत्र विधीचे ।।४५।।
आकळीता पंथ दीक्षा । परीघे नवीन कक्षा ।। लाभे अधिकार प्रत्यक्ष । प्रवर्ते गुरुवाणी ।।४६।।
सेवे जाहली घडण । ग्रंथाभ्यासे स्थिर मन ।। फळ दीक्षा स्विकारण । नवा जन्म कार्य नवे ।।४७।।
या पुढील अध्यायांत । जयरामा नाम जगन्नाथ ।। वा महाराज ऐसे बोधीत । अवधान तेथ असावे ।।४८।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते षष्ठोध्यायः ।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय ७ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
किती कष्ट केले महान । तरी होत नसे पूर्णज्ञान ।। हवे जन्मांतरीचे पुण्य । तेंव्हाच ऐसे होतसे ।।२।।
इमामशाहांचे पंचमस्थानास । महाराज झाले नियुक्त ।। येथ नियती संकेत । सूक्ष्मार्थे जाणावा ।।३।।
गुरुकृपा होता पूर्वजन्मास । तेव्हा घडती ऐसे संकेत ।। नियतीने केल्या पूर्वयोजीत । भविष्यातील घटना ।।४।।
जेव्हा इमामशाह होते प्रत्यक्ष । असावा महाराजांचा संबंध ।। डोकावू जातां भूतकाळांत । दिसे इतिहास पुनरावृत्ती ।।५।।
मुक्ती दिली महासिहांस । तेच झाले कुमारी क्षेत्र ।। होते पांडव त्या स्थानांत । पदस्पर्श श्रीकृष्णाचा ।।६।।
अर्जुनाचा पुत्र । कारणार्थे तेथे गेला परिक्षीत ।। पुनर्जन्म तयास । लाभला भाभाराम नामे ।।७।।
इमामशाह होता समाधिस्थ । होते भाभाराम तेथ ।। पुनर्दर्शन झाले प्रत्यक्ष । होती तेथे कीकीबाई ।।८।।
कोठे वसावे कोणी । पूर्वीच कथीले होते गुरुंनी ।। भाभारामे सेवा करुनी । केला जन्म कृतार्थ ।।९।।
अंतसमयी ईच्छा तयांस । घडावे गुरुसेवेस ।। पुनर्जन्म येत तयास । जैसी अंतीम कामना ।।१०।।
तेच भाभाराम प्रत्यक्ष । अवतरले नाम जगन्नाथ ।। भाभाराम जन्मापूर्वी महाराजांस । इमामशाह दर्शन गंधमादन पर्वती ।।११।।
जगन्नाथ महाराजांचे पूर्व जन्मकथन । केले गुरुकृपे करुन ।। संदेह नसावा जाण । प्रत्यक्ष प्रमाण देतसे ।।१२।।
ईसवीसन दोन हजार तीन । बारा फेब्रुवारी दीनमान ।। श्री जगन्नाथ महाराजांनी येऊन । पूर्व जन्म ध्यानांत कथिले।।१३।।
त्याच दिवशी फैजपूरात । महाराज दर्शन लिहिले पत्र ।। आणि ग्रंथ लेखनारंभ । दोन दिवस पूर्वी केला ।।१४।।
घरी एक फकीर येऊन । बोलीला वचन ।। सहा महीन्यांपासून । कांही लिहीणे तव मनांत ।।१५।।
तरी आळस सोडून । करावे लेखन ।। वर्तता दिवस दोन । दर्शन जगन्नाथ महाराज ।।१६।।
या वरुन हेच निश्चित । त्यांचा संबंध जन्मार्जित ।। म्हणून मनींचे गुज । कथिले तयांनी ।।१७।।

तयांचे मनीचा होता हेत। जाणे दोघांनी पिराण्यास॥ परी ते घडले पूर्वीच। दक्षिण पिराण्यात होतो आम्हीं ॥१८॥
भक्त संशय छेदण्यास। केली वाकडी लेखन वाट॥ धरुनी पूर्व सूत्र। लेखन मार्ग क्रमितसे ॥१९॥
ऊत्तराधिकारी झाला सेवक। जयराम झाले जगन्नाथ॥ नाही कोणी धर्मी अनाथ। केले सनाथ जगन्नाथे ॥२०॥
पिराण्याचे पिठाधिश। रामजीकाका नामक॥ ब्रह्मलीन होत। वारस झाले सवजीकाका ॥२१॥
गुर्जर देशीं कच्छ प्रांत। ग्राम नानाअंगिया नामक॥ नूतन मंदीर सत्पंथ। होते ऊद्घाटन चैत्र मासी ॥२२॥
श्रीगुरुं समवेत। गेले होते महाराज जगन्नाथ॥ ऊद्घाटन कार्य पूर्त। केले सवजी काकांनी ॥२३॥
धर्मसभा होती रात्रीस। भाषणार्थी होते बहूत॥ महाराजांसी भाषण काल। पांच मिनिटे नियुक्त केली ॥२४॥
प्रथम भाषणे दोन। जाहली गुर्जरभाषेतून॥ महाराजांस केले पाचारण। भाषण करण्यासी ॥२५॥
बोलले महाराज अध्यक्षांस। माझे गुरु बैसले श्रोत्यांत॥ मजसी ना मानवत। दिसे यावरुनी गुरुप्रेम ॥२६॥
मग पुरुषोत्तम गुरुस। बैसविले ऊच्चासनांत॥ वंदुनी समस्तांस। भाषण आरंभिले ॥२७॥
घटपाट पुजा, ज्योतिर्ध्यान। अक्षर ब्रम्ह युगधर्म॥ प्रणवजप, पुनर्जन्म। विविध विषय अथर्वाधार ॥२८॥
भाषण चाले दोन घटी। श्रोते मंत्रमुग्ध होती॥ शास्त्राधारे श्रवतां विधी। झाले कृतार्थ ॥२९॥
जाहला महाराजांचा जयजयकार। झाले सवजीकाका चुकर॥ जाहले आपुले अवमूल्य। ऐसे तयां जाहले ॥३०॥
जुने मंत्र नूतन तंत्र। तया म्हणती पुरोगामित्व॥ हे न रुचले सवजीकाकांस। जुनी चिंधी जपत बसले ॥३१॥
पिराण्याचा पिठाधिश। कैसे साहणे गौणत्व॥ तयांचे चित्तात। रुजला मत्सर द्वेष ॥३२॥
मानवास दु:ख। तीन कारणे येत॥ देहास व्याधी ग्रासत। दु:ख दूर करावे औषध ॥३३॥
दुसरे जे दु:ख। येते लालसा लोभातून॥ तयांचे ऊच्चाटन। करावे लालसा त्यजुनी ॥३४॥
तिसरे दु:ख। ऊपजे मत्सर द्वेषांतून॥ तया निवटणे कठीण। घर करी चित्तात ॥३५॥
वृत्ती जर सात्त्विक। वा असे नम्रत्व॥ वा धारणा असता दृढ। तरीच ते नाश पावे ॥३६॥

शकुनाची बेडी । सुयोगे तुटली ।। परी तामसी वृत्ती । तैशाच राहती अंतरी ।।३७।।
प्रभवे जेथ ऊत्कर्ष । द्वेष मत्सर वसे तेथ ।। पिठाधिशाचे अहमत्व । वाढीस लागे ।।३८।।
महाराजांचा अपमान । कधी करीन ।। ऐसे गंड न्युन । विषवल्ली फोफावे ।।३९।।
अनुकूल काल सवजीकाकांसी । संधी पातली दैवासी ।। सुरत सत्पंथीयासी । सुचला एक विचार ।।४०।।
सुरतेहून पदयात्रा । न्यावी पिराणा क्षेत्रा ।। महाराज जगन्नाथा । धर्मध्वजा द्यावी अग्रत्वे ।।४१।।
सर्वांस ते मानवले । पंचावन्न होते यात्रिक ।। फाल्गुन शुध्द पोर्णिमेस । निघे यात्रा पिराण्यासी ।।४२।।
कालक्रमण मोजीता । पंधरा दीवशी जाईल यात्रा ।। भगवानदास दालवाला । योजिती आहार ऊपहार ।।४३।।
जेथ होत मुक्काम । चाले तेथे भजन पुजन ।। आनंदाचे ऊधाण । अती सर्वत्र वर्जयते ।।४४।।
परंतु तेराव्या दीवशीच । आली यात्रा पिराण्यास ।। सवजीकाका न करीती स्वागतास । क्रोध दरारा अंतरी ।।४५।।
ऊलट नियोजकांस । अद्वातद्वा बोलत ।। म्हणे अन्नसत्रावर । येथ बंदी असे ।।४६।।
वास्तविक अन्नसत्रावरी । नसे बंदी ।। केवळ पोलीस निरीक्षती । अन्न न जावे वाया ।।४७।।
सन एकोणीसशे त्रेसष्टांत । घटना घडून येत ।। विषण्ण अवस्थेत । यात्रा परते स्वग्रामी ।।४८।।
अडतीस वर्षानंतर । पुनरोक्ती ऐसीच ।। सन दोनहजार एकात । कोणी पदयात्री निघे पिराण्या ।।४९।।
इमामशाह लीला स्मरत । परिक्रमा करी आनंदात ।। दृष्टीस येतां गुरुक्षेत्र । सादरे वंदीले ।।५०।।
हाजरबेग समाधी । स्थान नगीना गोमटी ।। आठवित पूर्व स्मृती । वंदी कल्पवृक्ष कनकवीट ।।५१।।
जाण्या स्थान सोडून । न होतसे मन ।। नेत्रा मुग्ध करुन । साठविती दृश्य नेत्री ।।५२।।
आणि पिठाधिशास । विनवी यात्रिक ।। पांच सात दीवस सेवेस । द्यावी अनुज्ञा ।।५३।।
नेत्र विस्फारुन । मठाधिश बोलती वचन ।। जाहले दर्शन पूजन । आता प्रस्थान करावे ।।५४।।
येथे रहाण्याचा हट्ट । कदा नोहे इष्ट ।। कार्य होतां पूर्त । काय रहाण्याचे प्रयोजन ।।५५।।

गुरुस्थानासी वंदून । यात्रिक परते दुःखमने ।। जरी जागृत शिवस्थाने । परी पहारा पिशाच्चांचा ।।५६।।
दैवयोगे जाहला महंत । तया मानवतेचे पथ्य ।। देव बसे भूगर्भांत । महंत बसती तयांचे डोक्यावरी ।।५७।।
देव जमीनी खालती । आपण जमिनी वरती ।। ऐशा महंतांची ख्याती । असे अधिक देवाहून ।।५८।।
समाधान न लाभे चित्तास । शांति भंगे जेथ ।। जागृत असे जरी क्षेत्र । खुशाल तया त्यजावे ।।५९।।
देवतांची ऐसी गत । भक्तांसाठी होती प्रकट ।। ऐसे दाखले बहूत । येती अनुभवा ।।६०।।
दर्ग्यातील पीरास । भावे भजे भक्त ।। तेंव्हा पीर होती प्रकट । केवळ भक्तांसाठी ।।६१।।
त्या पीरांचे स्थान । ख्यात छल्ला म्हणून ।। दर्ग्यासम जागृतपण । असे तेथे ।।६२।।
पिराण्यातुनी पाऊळगोळी आणून । इमामशाहांचे करुन ध्यान ।। यथोचित पूजार्चन । अनुष्ठावी नारायण गायत्री ।।६३।।
जंव इमामशाह दर्शन देती । मागावी मंदीरा अनुमती ।। प्रति पिराणा महती । जागृती गुरुंची ।।६४।।
परी तयास । असावा ऊत्कट ध्यास ।। रावण ध्यायी शिवास । ऊचली कैलास भक्तीने ।।६५।।
तेंव्हा प्रती कैलास । क्षेत्र गोकर्ण ख्यात ।। तैसे ऊचलुनी पिराण्यास । आणणे भक्ता शक्य असे ।।६६।।
महाराष्ट्र आणि गुर्जरदेश । जनांत असे तेढ ।। ऐसी अनुभविक नोंद । ठेविली महाराजांनी ।।६७।।
परी विजययात्रा । प्रभवे धर्मशास्त्रा ।। आनंद जगन्नाथा । परतले फैजपुरी ।।६८।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते सप्तमोध्याय:।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय ८ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
मंदीरातील कर्तव्यकर्म । आल्या गेल्या प्रश्न निरुपण ।। गांवो गांवी पूजाअर्चन । नसे ऊसंत महाराजांसी ।।२।।
वेळ अल्प, ऊद्योग अनंत । सर्वांभूती आदरयुक्त ।। नसे क्रोध नसती संचित । सर्वदा हास्यवदन ।।३।।
आत्मभावे समस्तांसी । प्रेमभावे वर्तती ।। दूरदूरचे जन येती । महाराज दर्शना ।।४।।
सत्पंथा विषई किल्मीष । निरसविती वेदाधारास ।। समयसूचकता विशेष । असे तयांपासी ।।५।।
ऊत्तराधिकारी असून । शांत आणि नम्रपण ।। षड्‌गुण ऐश्वर्य संपन्न । असती महाराज ।।६।।
श्रेष्ठता असूनी सेवक । जैसे मच्छींद्र गोरक्ष ।। आणि महती विशेष । वाढविती महाराज ।।७।।
गुरु पुरुषोत्तम । पाहूनी ऐशा शिष्यास ।। जाहले कृतार्थ । ऊत्तम शिष्य लाभता ।।८।।
एकदां गुरु पुरुषोत्तम । वसले असतां मंदीरात ।। तंव कोणी स्त्री येत । वंदी तया साश्रूनयने ।।९।।
ऊभी मुख फिरवुनी । पदतळी थरारे धरणी ।। गेली वाचा विरुनी । गिळीतसे आपुले दुःख ।।१०।।
भूत भविष्याचा व्यास । ऊभी मध्यबिंदूस ।। नैराश्याचा परिघ । असे भंवती तियेच्या ।।११।।
नसे प्रश्न नाही ऊत्तर । गंभीरता सर्वत्र ।। शब्द ऊद्‌भवती मौनात । निःशब्दे अर्थता ।।१२।।
पुरुषोत्तम महाराजांचे सहोदर । रेवा भारंबे नामक ।। एकदा तयांची मुलगी । आली भेटण्या काकांस ।।१३।।
सतरावे वर्षी जाहले लग्न ।होती संसारी रममाण ।। पतीने काडीमोड देऊन । धाडीली माहेरी ।।१४।।
सन एकोणीसशे सदुसष्ट । स्त्री आली माहेरास ।। दुःख असम साहस । नाम तीचे बेबीताई ।।१५।।

गुरु म्हणती तीयेस । करु नको दुःखास ।। जैसे ईश्वरी मानस । तैसे घडून येतसे ।।१६।।
सोडूनी दुःख यातना । सेवी नारायणा ।। तो सर्वाधार सर्वांना । परित्यक्तेचा विश्वपती ।।१७।।
पती नसे जीयेस । तिचा पती श्रीनिवास ।। ऐसी ग्वाही शास्त्र । नित्य देती ।।१८।।
अती दुःख तुझे मनी । ते अर्पी नारायणी ।। मन लागतां अन्य स्थानी । निवृत्ती होत दुःखाची ।।१९।।
नेत्रीचे अश्रु पुसून । स्मरे मनी नारायण ।। ज्योतिर्नारायणा करीतां वंदन । मुखांतुनी स्त्रवे गीत ।।२०।।

-गीत-

धांव पावरे श्री नारायण । भक्तांचे कैवार, दयाळा भक्तांचे कैवार ।। दिवस रात्र तुला प्रार्थिते । सुवासिनी मी नार ।।धृ।।
मंगळसुत्रा वेष्टून राहे । ही तुळशीची माळ देवा ।। कुंकुमासी खुलवित राहे । भस्मांकीत भाळ माझे ।।
सुवासिनीला कां रे जडविला, तपस्विनीचा साज ।।१।।
पतीछायेसी मुकुन गेले । छाया अश्वत्थी मजला ।। अन्नपूर्णा आज फिरते । देवा भिक्षार्थि ।।
करामधें ज्या । पुत्र असावा ।। तीथे जपाची माळ । हो देवा ।।२।।
अंगावरती करपुन गेले । माझे तारुण्य ।। कल्पतरुंच्या वनांत झाले ।। कैसे अरण्य ।।
नाहीं कोणी । ऊरला त्राता ।। तूच खरा । आधार माझा ।।३।।
सदा स्मरे नारायण । श्रीमद् भागवत वाचन ।। गेले भूतकाळाचे स्मरण । रत प्रभू सेवेत ।।२४।।
मंदीर सेवा कार्यात । मग्न असे अविरत ।। स्वयंपाकादी कृत्य । करी आवडीने ।।२५।।
चित्रकला, गायन वादन । जन्मजात महाराजांसी ज्ञान ।। चित्र रेखीले हनुमान । पाहतां गुरु संतोषले ।।२६।।
एकदां महाराज । बोलले बेबीताईस ।। अती कठीण परमार्थ । गीरी दुःखाचे ओलांडणे ।।२७।।

जनांचे अपवाद । सहन करणे अवघड ।। होऊं न देती अश्वारुढ । पायी चालणे कठीण करीती ।।२८।।
प्रवाहाचे दीशे विरुध्द । पोहणे अती अवघड ।। परी असतां निर्धार । अशक्य शक्य होईल ।। २९।।
ताई बोले महाराजांसी। नसे विचार पुनर्विवाहासी।। तोंड भाजले दूध प्राशनासी । फूंकून पिणे उत्तम ।।३०।।
देवे सोडविले प्रपंचातून । तोडीले गळफास बंधन ।। ईश्वर सेवा कर्तव्य कर्म । अन्य नाहीं ऊरले ।।३१।।
सत्य संसाराची रुची । आला योग मजसी ।। रत होणे ईश्वर पदासी । तया म्हणावा योग ।।३२।।
काल दिसे ते आज नसे । आजचे ऊद्या नसे ।। शाश्वत कांही नसे । फसवे तरंग जीवना ।।३३।।
जाणीव माझे मनास । जीव वेचावा ईश्वर सेवेत ।। तयाने होईन कृतार्थ । जन्म सार्थकेल ।।३४।।
जैसे ईश्वरी संकेत । झाले बंधनातून मुक्त ।। महाराजांसी राखी बांधीत । धर्म भगीनी जाहली ।।३५।।
संस्कृत श्लोकांचे पठण । संत चरित्रे वाचन ।। करीतसे धनार्जन । कपडे शिवूनी ।।३६।।
मंदीर सेवे व्यतिरीक्त । काम करी शेतात ।। जरी स्वकीयांचा विरोध । तरी ना जुमानी ।।३७।।
इतिहासाची पुनरावृत्ती । होते पुनरपी ।। ताई गतजन्माची । कीकीबाई असावी ।।३८।।
ताईच्या जीवनासमान । होते कीकीबाईचे जीवन ।। तीये भेटता भाभाराम । सुवर्णमय जीवन झाले ।।३९।।
त्याच प्रमाणे ताईस । भेटले महाराज ।। रुणगावचे ऋण । फीटले फैजपूरी ।।४०।।
मंदीरी भिंतीवरती महाराज । सुंदर रेखीती चित्रे ।। तैसी वचने निरुते । लीहीती चित्र विषय ।।४१।।
एकोणीसशें एकोणसत्तरांत । गुरुसी भेटले भक्त ।। बोरोले, महाजन, भिरुड । करीती निवेदन ।।४२।।
पाट कलशाचे स्थान । बदलणे वाटे मना ।। करण्या प्रदक्षणा । मार्ग सुकर होईल ।।४३।।
त्या प्रमाणें मंदीरस्थान । बदलले नूतन ।। गुरु पुरुषोत्तम । जैसी अनुज्ञा तयांची ।।४४।।
एकोणीसशें सत्तर सना पर्यंत । रेखीत होते चित्र ।। निष्कलंकी नारायण दरबार । युक्तत्वें रेखीला ।।४५।।

चित्र रेखनी मग्न असता । आली मंगला नाम कन्यका ।। प्रश्न करी विशेषा । दशवर्षिय होते वय ।।४६।।
महाराज आपण । पाहीला कां नारायण ।। वा आपण स्वयम् । नारायण का आहाती ? ।।४७।।
प्रश्न ऐकता विचित्र । करीती महाराज विचार ।। आणि सांगती तीयेस । चित्री देव देखिला ।।४८।।
कांही कार्यानिमित्त । महाराज गेले भावनगरास ।। पंधरा दीवशी येता फैजपूरास । दुःख नावरे तयांसी ।।४९।।
नवज्वर ग्रासे मंगलेस । आणि गेली परधामास ।। सांगती महाराजांस । तीचे मातापिता ।।५०।।
आपुले छायाचित्र वक्षी धरुन । अंतसमयी जपे आपुले नाम ।। तीचे अंतीम वचन । सोड्नी मज गेले महाराज परग्रामा ।।५१।।
श्रवता ऐसे शब्द । नावरे महाराजा अश्रुपुर ।। ऊत्तम आत्मा सत्पंथीय । वदले महाराज ।।५२।।
गुरु पुरुषोत्तम । न्यायालयांत खेपा करुन ।। हवालदील झाले आपण । आली करुणा नारायणा ।।५३।।
वर्तली वर्षे एकवीस । झाले मंदीर बंधन मुक्त ।। तेव्हांपासुनी भरभराट । जाहली मंदीराची ।।५४।।
सत्य संकल्पाचा दाता । असे विधाता ।। तयाची दंडसत्ता । विश्वावर असे ।।५५।।
श्री गुरु पुरुषोत्तम । कृतार्थ झाले आपण ।। जगन्नाथ शिष्यरत्न । लाभले पूर्व पुण्ये ।।५६।।
महाराजांचा पायगुण । सत्पंथासी भूषण ।। जाहले धर्मवर्धन । गंधमादनाचा महर्षि ।।५७।।
अध्याय हा अष्टम । भगवतीचे वरदान ।। अभाग्यासी सौभाग्यपूर्ण । ऊध्दरे परित्यक्ता ।।५८।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते अष्टमोध्यायः ।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय ९ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
चित्रकूटके घाटपर, लगी संतनकी भीर ।। चंदन घस्यो तुलसी, और तिलक करे रघुवीर ।।२।।
खंबायतीचे जन । आले तयांचे मना ।। कीकीबाईचे मंदीर रुण । करावी पदयात्रा ।।३।।
पदयात्रेचे प्रमुख । करावे महाराजांस ।। केवळ तीन दीवस । यात्रा काल असे ।।४।।
झाला आनंद महाराजांस । जाणे कीकीबाई ग्रामास ।। परिक्रमा यात्रेस । मुक्काम झाला पलोल ग्रामी ।।५।।
राम-हनुमान मंदीरासी । दोन प्रहर समयासी ।। महाराज विश्रांती । होते घेत ।।६।।
आणि अचानक । महाराजांचा मागोवा घेत ।। आली व्यक्ती एक । भेटण्या महाराजांसी ।।७।।
अंगामध्ये बंडी । तुलसीदासा सम टोपी ।। पंचा परिधानती । महाराजा लाविला चंदन तिलक ।।८।।
कांही दक्षिणा देण्यास । घालती हात खिशात ।। न लगे दक्षिणा मज । व्यक्ती वदतसे ।।९।।
महाराज पुसती तयास । काय हवे आपणास ।। द्यावे मज जपस्मरणीस । वदे अतिथी ।।१०।।
जपस्मरणीची भीक्षा । द्यावी जगन्नाथा ।। महाराज वदले अन्य मागा । खंबायतकरांनी दीधली माळ ।।११।।
अन्य माळ आपणापासी । ती द्यावी मजसी ।। माळ कैसी द्यावी नित्याची । पुसती तया महाराज ।।१२।।
वदे मग अतिथ । आपुला सदरा द्यावा मज ।। महाराज म्हणती एकच । असे सदरा मजपासी ।।१३।।
आणि इतक्यांत । जमले सतपंथी भक्त ।। उर्ध्व स्वरे वदे अतिथ । तु आहेस पागल ।।१४।।
अरे पागला मज । कांही देणे तुज अशक्य ।। जरी पातला ईश्वर । तो ही नसे दाता ।।१५।।

एक दोन तीन चार । चार बाह्या दावी वदत ।। महाराजा बोलती भक्त । बोलू नये पागलासी ।।१६।।
बोलले जगन्नाथ । पागल म्हणूं नये यास ।। धरुनी पागल रुपास । कोणी महात्मा आला असे ।।१७।।
व्यक्ती वदे जनांस । मज हंसणे ना शोभे तुम्हास ।। मी आणि महाराज । दोघेही आहोत पागल ।।१८।।
आणि पुसे महाराजांसी । काय देऊ तुम्हांसी ।। नसे कांही अपेक्षा मजसी । द्यावे मात्र एक ।।१९।।
सत्पंथ वर्धनास । द्यावे मज आयुष्य ।। आपुली कृपा आम्हांस । असावी निरंतर ।।२०।।
व्यक्ती वदे हंसुन । त्यासाठीच तुमचा जन्म ।। ईश्वर करील कल्याण । आशिर्वदुनी गुप्त झाले ।।२१।।
महाराजा पुसती भक्त । व्यक्ती कोण विशेष ।। भाभाराम आले होते दर्शन देण्यास । महाराज वदले ।।२२।।
परतता गुजराथेतून । नाथुभाई घरी होता मुक्काम ।। तेथे देखीला ग्रंथ महान । मूळबंध इमामकृत ।।२३।।
वदले नाथुभाई महाराजांशी । ग्रंथ झाला जीर्ण ।। करण्या त्याचे पुनर्लेखन । कोणी मिळेना ।।२४।।
वदले महाराज हंसुन । करु आम्ही लेखन ।। काल वर्षे दोन । कार्यार्थ गेला ।।२५।।
त्याच्या दोन प्रती । छायांकीत करुनी घेती ।। आणि त्या रक्षीती । फैजपूर मंदीरी ।।२६।।
एकोणीसशें सत्त्याहत्तर सन । नाथुभाई पित्याचे अस्थि विसर्जन ।। गंगा तटाक लक्षुन । गेले महाराज ।।२७।।
पातले हरिद्वारास । पाहीला गंगा अमोघ वेग ।। पाहीला निळकंठ पर्वत । दर्शन हृषिकेशाचे ।।२८।।
पूर्वी जेथे मुनी वसती । म्हणती तया मुनीकी रेती ।। आचरती स्नांनादी । बदरी नारायण पथ लक्षीला ।।२९।।
व्यास महर्षिंचे स्थान । अलकनंदा संगम ।। असे तेथे ध्यानमग्न । नारायण बदरी ।।३०।।
तुलसी प्रसाद । आदरे घेत ।। जाती पथ आक्रमित । केदारनाथाचा ।।३१।।
हळद कुंकुम मिश्रीत । तैसा जलवर्ण ऊष्णोदक ।। ख्यात गौरीकुंड । स्नानादी आचरती ।।३२।।

हीमाचल धुम्रवर्ण । केले केदार दर्शन ।। महीष पृष्ठा समान । ज्योतिर्लींग केदारनाथ ।।३३।।
विशेष पुजा पध्दती । लींगासी घृत चोळीती ।। बद्री पृष्ठ भागासी । स्थान भैरव झेप ।।३४।।
या स्थानाहून । केले पांडवांनी स्वर्ग गमन ।। भवती असती महावने । सुरु तरुंची ।।३५।।
रमणीय स्थान पाहून । महाराज मुखातून ।। झरे सरस्वती ओघवान । असे स रसवती ।।३६।।
आवाखल ग्रामांत । करणे दशावतार सप्ताह ।। निमंत्रण देण्या महाराजांस । आले गोविंदभाई ।।३७।।
पिराण्याचे बाबा शमसुद्दीन । केला दशावतार पुनर्मुद्रण ।। सप्ताहा ग्रंथ जुना कीं नूतन । वाद निर्माण झालासे ।।३८।।
तेथे विनानिमंत्रण । आले आगांतुक शमसुद्दीन ।। करुनी ग्रंथ प्रकाशन । जैसे आले, गेले तैसे ।।३९।।
इमामशाह प्रणीत । वैदीक असे सत्पंथ ।। हे सप्रमाण सिध्द । दाविले महाराजांनी ।।४०।।
दशावतार सप्ताहास । प्रमाण जुना ग्रंथ ।। ग्रंथ नवा प्रकाशित । दाविला प्रक्षीप्त गोमेध ।।४१।।
गोमेध, नरमेध, अश्वमेध । यज्ञ असती हींसक ।। श्रीरामाने अश्वमेधात । कापुराने हवन केले ।।४२।।
विजययात्रा संपादीत । महाराज आले फैजपूरास ।। क्षीणता आली प्रकृतिस । गुरु पुरुषोत्तमांच्या ।।४३।।
सव्वीस जुलै एकोणिसशें ब्याऐंशी सन । गुरु पुरुषोत्तम ।। चक्कर येऊन । पडले अकस्मात ।।४४।।
वाढला रक्तदाब । ऊठले चार वाजतां दुसरे दीवशीच ।। इस्पितळा न्यावे जळगांवास । करीती समस्त विचार ।।४५।।
पुरुषोत्तम सांगती । नका नेऊ जळगांवासी ।। येथेच राहूदे मजसी । सरे भरवसा आयुचा ।।४६।।
केला बेबीताईंनी स्वयंपाक । जेवण्यासी गुरु सांगत ।। ताई गेली गृहास । ती आल्यावर जेऊ वदले महाराज ।।४७।।
महाराजांस पाचारुन । म्हणती मी झालो धन्य ।। सत्पंथ धर्म वर्धन । केले तुंवा ऊत्तम ।।४८।।
कार्य तुझे पाहून । अतीव झाले समाधान ।। चतुर्भुज नारायण । आहेत तव पाठी ।।४९।।

भाग्य माझे परम । तु लाभला शिष्योत्तम ।। होसिल पुरुष ऊत्तम । पुरुषोत्तम वदले ।।५०।।
सत्पंथ ऊध्दारासी । अती कष्ट झाले तुजसी ।। भरुन पाहती नेत्रासी । दुरावा साहणे असंभव ।।५१।।
जन्म असुनी जन्मरहीत । मंदीरी घेतले अती कष्ट ।। पाचार बेबीताईस । केला परमार्थ प्रपंचाचा ।।५२।।
तुम्हां दोघा सोडूनी । जाणे मज अती कठीण ।। तुम्हांत घोटाळे प्राण । हालले मूलाधार ।।५३।।
दशप्राण एकवटत । नेत्री झरे अश्रुपात ।। आम्हीं धरेचे यात्रिक । परतणे कदा तरी ।।५४।।
सरले शब्दांचे संकेत । करे कल्याण आशिर्वचित ।। गुरुंचे कर्ण रंध्रात । त्रिवार गायत्री महाराज प्रेषिती ।।५५।।
आली ताई मंदीरात । केवळ दिसती ऊघडे नेत्र ।। गुरुंची प्राणज्योत । विहरे अंतराळी ।।५६।।
मंदीरी जाहला आक्रोश । गेले गुरु परधामास ।। वार्ता होता श्रृत । जनसमुदाय धांवला ।।५७।।
अंत्ययात्रेचे वर्णन । न करी अधिक ।। केवळ दुःखद लाभ । पूर्वस्मृतींचे वर्धन ।।५८।।
मंदीराच्या शेतांत । दिला गुरुंसी भूमीडाग ।। युक्त विधी यथोचित । जगन्नाथ महाराज करीती ।।५९।।
कांही काला नंतर । बांधले समाधी मंदीर ।। आहेत समाध्या तीन । पुरुषोत्तम, धर्मा, बारसु महाराज ।।६०।।
श्री गुरुंचे अनुज्ञेस । झाले जगन्नाथ पिठाधिश ।। निगुणे नव आवर्त । विराजमान फैजपुरी ।।६१।।
फैजपुरचे महीमान । पिराणा दक्षिण ।। आवर्ती संगम । सरस्वतीचा ।।६२।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते नवमोध्याय :।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय १७ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
श्री गुरु समाधिस्थ झाल्यावरी । वाढली मंदीर जबाबदारी ।। भक्तांची सरबराई । करणे लगे ।।२।।
परी धैर्य धरुन । घेती सर्व सांभाळून ।। बेबीताई आपण । मंदीरी सदा सिध्द असती ।।३।।
पहीला पुण्यतिथी ऊत्सव । कानळदे ग्राम कण्वाश्रमांतील ।। चंद्रकीरण महाराजांचे ऊपस्थितीत । जाहला संपन्न ।।४।।
शोभायात्रा निघाली गांवातुन । विष्णूयाग होम हवन ।। प्रसाद आणि अन्नदान । जाहले अमूप ।।५।।
समाधीस्थानांत । चरणपादुका प्रतिष्ठीत ।। तेव्हापासून अविरत । ऊत्सव होतसे ।।६।।
चंद्रकीरण महाराज । विनविती गुरुंस ।। मजपाशी असावे कानळद्यास । अमाप असे संपत्ती ।।७।।
महाराज वदले तयांस । नाहीं मज त्यांत रस ।। पूर्वी पाचारीले पीराण्यास । परी मी नकार दिला ।।८।।
राहून फैजपूरांत । करीन कार्य सत्पंथ ।। अन्यस्थान मज । रुचत नसे ।।९।।
सत्पंथ मंदीर धानोऱ्यात । पूजा होती पूर्वापारीत ।। तयांसी पुजा पुरोगामिक । कथीली महाराजांनी ।।१०।।
करसनदास महंत । पीराण्याचे पीठाधिश ।। काढून स्वतंत्र आदेश । पुरोगामी पुजा मान्य केली ।।११।।
महाराजांची पुण्याई थोर । होतसे मंदीर जीर्णोध्दार ।। इमामशाहांची पाखर । नून्यता नसे कदा ।।१२।।
श्रद्धास्थाने असावीत । सुंदर आणि स्वच्छ ।। मन रममाण तेथ । असतां रमणीयता ।।१३।।
संतकृपा धर्मशाळा । वास्तु असे सोज्वळा ।। रेखीव आणि तेजोबला । मूर्ती इमामशाहांची ।।१४।।
दिसे मूर्तीत चैतन्य । काषायांबर प्रावरण ।। वाटे तेजोनिधान । विवरण करीती वेदांचे ।।१५।।
हेच ते पुण्यस्थान । लागले श्री गुरु चरण ।। येथेच संकल्प महान । केला पंचम स्थानाचा ।।१६।।

संकेत वास्तु विवेचन । मनोरा असे अतिमान । चारी बाजू रक्षण । करीती गरुड हनुमंत ।।१७।।
चार समयदर्शिका । मनोऱ्यावरी असती देखा ।।जणु अर्जुनाचे रथा । ध्वजा रक्षी महाशक्ती ।।१८।।
सन एकोणीसशें अठ्ठयानऊ । दहा ऑगष्ट दिनांक ।। अती वर्षा घोंघावत । आणि विद्युल्लता कोसळली ।।१९।।
मनोऱ्यावरील तारांनी । टाकीली विज गिळूनी ।। रक्षीले महाशक्तींनी । पंचमस्थान गुरुंचे ।।२०।।
फैजपूर गांवात । झाले नुकसान अमित ।। परी आपुले ब्रीद । राखीले गुरुंनी ।।२१।।
जेथे काला नसे तरुणोपाय । तेथ वीज करील काय ।। पंचभूतांचे स्तंभीत कार्य । असतां विश्वात्मक रक्षीता ।।२२।।
आश्रमाची होती वास्तुशांती । पुण्याहवाचनादी विधी ।। आले महाराज बाहेरी । व्यवस्था पहाण्या ।।२३।।
झाले पहाता चकीत । पक्षी अनोखा दिसे एक ।। इंद्रधनु वर्णांकीत । कोठून आला न कळे ।।२४।।
स्थानी स्थानी बसुन । करी पक्षी विहरण ।। बेबीताई करीती पूजन । विहंग शांततेत स्विकारी ।।२५।।
महाराजांचे शयन स्थानी । वसे मुग्ध होऊनी ।। मग इमामशाह प्रतीमा स्थानी । चार घटी बैसला ।।२६।।
अकल्पीत येता श्रवणा । दर्शना धावले जन ।। आठ घटी जाण । पक्षी होता मंदीरी ।।२७।।
बेबीताईंनी ऊचलून त्यास । ठेविले टोपलीत ।। तयाचे स्पर्शांत । जाणवे प्रवाह विजेचा ।।२८।।
तीर्थजल दूधभात वाटीत । दाविला नैवद्य ।। अन्नासह तयास । बंद खोलीत ठेविले ।।२९।।
दर्शनासी येती भक्त । ऊघडीले द्वार ।। परी पक्षी नव्हता तेथ । भात तीर्थ सेवुनी अदृश्य झाला ।।३०।।
प्रत्यक्ष शाह इमाम । आले पक्षी रुप धरुन ।। देऊनी आशिर्वचन-दर्शन । पातले स्वस्थाना ।।३१।।
हे जरी वाटेल असत्य । छायाचित्रे आहेत साक्ष ।। फैजपुरी मंदीरांत । आर्त जने पहावी ।।३२।।
सन एकोणीसशें एकोणनव्वदांत । मंदीरी आले दोन बालक ।। अकरा वर्षे होते वय । आले मंदीरी सेवेसी ।।३३।।
पांच वर्षांपासूनी । राखीती सतपंथ धर्म ।। आवड भजन पूजन । महाराजांनी ठेविले तयांसी ।।३४।।
शालेय शिक्षणा सवेच । सत्पंथ साहित्य अभ्यास ।। आणि प्रगती होत । विधी पूजा अर्चादी ।।३५।।

जनांसी कैसे करावे वर्तन । बेबीताईंची शिकवण ।। जन्मांतरीचे संकेतन । लाभले भावे तयांसी ।।३६।।
नवरात्रादी दुर्गा ऊत्सव । रामनवमी कृष्णजन्म ।। होती मंदीरी ऊत्साहपूर्ण । ऊत्सव प्रीय जनता ।।३७।।
बेबीताईस पहील्यापासून । आवड मीरा भजन ।। नसे कष्टांचे भान । मग्न असतां भजनी ।।३८।।
एकदां सायंकालेसी । बेबीताई बसल्या ध्यानासी ।। करीता त्राटक ज्योतीसी । प्रभवे नीलवर्ण ।।३९।।
कुंडलीनी आदीशक्ती । भेदे जंव मणीपुरासी ।। तंव येती मुखांतुनी काव्यपंक्ती । वरदान सरस्वतीचे ।।४०।।
वाटे शाम घननीळ। ठाकला प्रत्यक्ष समोर ।। आणि वैखरीतुनी ओघळले स्वर । सरस्वती शारदेचे ।।४१।।
होऊनी विभोर । आळवी गीत सुंदर ।। प्रतिभेचे पूर्णद्वार । जाहले ऊघडे ।।४२।।

– गीत –

शाम मोरी नैया, कैसे लागे पार ।। बीच भंवरमे जीवन कश्ती, आवो नंदकुमार ।।धृ।।
तुही गिरधर कृष्ण मुरारी, धनंजयकी राखे सवारी ।। ओ निर्मोही कहाँ छुपे हो, तुही जिवनाधार ।।१।।
द्रौपदीकी लाज बचायी, ऋषिजनोंकी भूख मिटायी ।। राह तेरी कीतनी देखू, टुटे बिनाकी तार ।।२।। ।।४५।।
बेबीताई ध्यानमग्न, भरे चराचरी श्री नारायण ।। महाराज गेले आनंदुन, पाहतां अवस्था ऐसी ।।४६।।
योगियांसी जे दुर्लभ, सहज तयाचा झाला लाभ ।। परा पुजा झाली समग्र, झाली असे ताई कृतार्थ ।।४७।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते दशमोध्यायः।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय ११ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नम: ।। ॐ श्री सरस्वत्यै नम: । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नम: ।।१।।
श्री जगन्नाथ महाराज । आकर्षण समस्तांस ।। येती नित्य नूतन लोक । दर्शन श्रवणे कृतार्थ होती ।।२।।
अती ऊत्साह, आनंद । नियती रोधे तयास ।। सुखानंदाचे सत्र । असह्य होत कालासी ।।३।।
कृतार्थता येता मनास । तेथे जाणा मार्ग छेद ।। विभवाचा भाव । कदा भव होतसे ।।४।।
जरी भाभारामांचा अवतार । तरी नियती बंधनपर ।। धरीता पंचभौतिक शरीर । तया ग्रासिती व्यथा व्याधी ।।५।।
ईश्वराने धरीले अवतारास । नियती नियम ना सुटती तयास ।। धरीता मानवरुप । मानवान्वयें वर्तणे लागे ।।६।।
हृदयविकाराचा सौम्य झटका । आला महाराजांसी देखा ।। सतरा मार्च दिनांक । एकोणीसशें सत्त्याण्णव सन ।।७।।
औषधोपचार व्यवस्थित । होते महाराजांस ।। तरी सत्तावीस जुलैस । झटका झडपे तीव्रत्वे ।।८।।
सुभाष चौधरींच्या इस्पितळातून । नेले तया मुंबईस ।। नायर इस्पितळांत । केली एन्जीओग्राफी ।।९।।
ऐसा वैद्यकीय विचार । काढणें शरीरांतील जीर्ण रुधीर ।। आणि नवीन रक्त । खेळवावे शरीरी ।।१०।।
डॉ. पाटील राजेंद्र । केली शस्त्रक्रीया ऊचित ।। दिनांक वीस ऑगष्ट । सत्याण्णव सन ।।११।।
मुंबईत राहून काही दिवस । आणिले महाराजा फैजपूरात ।। अती अशक्तता देहास । गावोगांवी जाणे थांबले ।।१२।।
सत्पंथीय कर्मास । झालासे रोध ।। कार्य असावे अविरत । ईच्छा तया मानसी ।।१३।।
मन असे ऊभार । साथ ना देई शरीर ।। जे लावीले रोप । वृक्ष होण्या काय करावे ।।१४।।
दोन बालके मठात । आहेत सेवारत ।। तयांसी वर्षे आठ । झाली मंदीरी येऊनी ।।१५।।
पंथप्रमाण पुजादि पद्धत । जाहली तयांसी ज्ञात ।। पाचारुनी तयांचे मातापित्यांस । महाराज पुसती ।।१६।।

शालेय शिक्षणादी पूर्त । झाले तुमचे पुत्र ।। तैसा पंथीय साहित्य अभ्यास । अजुनही करीती ।।१७।।
पंथाचे कार्य । वाटे करतील व्यवस्थित ।। दीक्षा द्यावी तयांस । ऐसे मानस माझे ।।१८।।
अर्पण न होता मंदीरास । ते केवळ सेवक भक्त।। जैसे धन अनामत। केव्हांही येई स्विकारता ।।१९।।
अर्पण म्हणजे दान । न मिळे पुन्हां मागुन ।। दान वा अर्पण । नसे त्यावर अधिकार दात्याचा ।।२०।।
मुलांचे मातापिता । सांगती महाराजांस ।। घेता मुलांचे अनुमतिस । असे आमुची संमती ।।२१।।
पाचारुनी मुलांस । पुसती महाराज ।। द्यावी पंथदिक्षा तुम्हांस । ऐसे वाटे ।।२२।।
मुले होऊनी आनंदीत । देती रुकार त्वरीत ।। आपुले होणे पुत्र । महाभाग्य आमुचे ।।२३।।
तया बोलले महाराज । विचार करावा शांत ।। विना विचार निर्णय । कदापि योग्य नसे ।।२४।।
दीक्षा देता तुम्हांस । आचरणे ब्रम्हचर्य आजन्मांत ।। नाहीं अन्य पर्याय । गृहस्थाश्रमी जाण्यासी ।।२५।।
वय तुमचे वीसात । खेळे मदन गात्रात ।। देही मदनाचा वास । चोवीस स्थानी असे ।।२६।।
महातपी शंकर । पत्नी पार्वती सुंदर ।। तरी भाळला भिल्लीणीवर । जरी गंगा मस्तकी ।।२७।।
विचारी गणेश । ऊमापुत्र म्हणवी स्वतःस ।। परी गंगापुत्र । कदां न म्हणे स्वतःसी ।।२८।।
काम नावरे शंकरासी । ऋषीने शापले तयासी ।। द्वादश भाग भग्न लिंगासी । ती ज्योतिर्लिंगे ।।२९।।
महामुनी विश्वामित्र । भाळला मेनकेवर ।। तेंव्हा तयाचे तप । नष्ट जाहले ।।३०।।
त्रैलोक्य येती घेता जिंकुन । मदना जिंकणे कठीण ।। जरी स्वप्नी स्त्री सन्नीधान । नष्ट पावे ब्रम्हचर्य ।।३१।।
ब्रम्हचर्य आचरण्यास । असे एक ऊपाय ।। होतां मदन संचार । स्मरहर स्मरावा ।।३२।।
मुले वदली महाराजांसी । आजन्म राहू ब्रम्हचर्येसी ।। कृपा करुनी आम्हांसी । करावी दीक्षा प्रदान ।।३३।।
जाणता मुलांचे मनोगता । तयांचे मातापिता ।। मंदीरासी समर्पीत । झाले मुलांसी ।।३४।।

दिनांक डिसेंबर बावीस । सन एकोणीसशें सत्त्याण्णवास ।। शुभ दिवस निश्चित । करण्या दीक्षा प्रदान ।।३५।।
पुरोहीत पाचारुनी पांच । संपन्न झाला विष्णूयाग ।। विधी यथाविध । घेतले करवुनी मुलांकरवी ।।३६।।
गायत्री मंत्रा समवेत । नारायण गायत्री मंत्र ।। प्रेरीला मुलांचे कर्णरंध्रात । षट्कर्णी मंत्र अग्राह्य ।।३७।।
जंव करणे गुरुमंत्र प्रदान । स्थानिय देवता जाती निघून ।। गुरु शिष्य दोघेजण । दृश्य अदृश्य शक्ती तेथ नसती ।।३८।।
रामदास लहेनसिंग चव्हाण । नामांकरण जनार्दन ।। पूर्णानंद नामकरण । झाले प्रमोद विनायक शिसोद्यांचे ।।३९।।
लहेनसिंग, विनायक । सरले त्यांचे पितृत्व ।। पीता गुरु जगन्नाथ । नूतन जन्म मुलांचा ।।४०।।
जाहला मोठा ऊत्सव । गांवातुनी काढली मिरवणुक ।। विरले भक्त सेवकत्व । शिष्याधिकार लाभला ।।४१।।
मंत्र गुरु जगन्नाथ । इमामशाहांसी परम गुरुत्व ।। ऐसाच असे संकेत । परमगुरु आशिषे ।।४२।।
जंव देह भरंवसा सरत । तेव्हां ऊत्तराधिकारी नियुक्त ।। झाले महाराज निवृत्त । परमार्थ सोपविला शिष्य करी ।।४३।।
शिष्य होता अधिकार युक्त । जनकार्या अधिकार प्राप्त ।। शिष्य जाहले पुत्र । सांभाळीती गुरुपिता ।।४४।।
प्रापंचिक पुत्र । कदा पिता अवमानित ।। परी पारमार्थिक । आज्ञाधारक गुरुंचे ।।४५।।
जन निमंत्रणानुसार । जावोनी गांवोगांवात ।। करीती कर्मकांड । पंथ धर्माधारे ।।४६।।
महाराजांचे धर्मकार्य । न होणे कदा खंडीत ।। सर्वांठायी ठेऊनी नम्रत्व । कार्य संपादीती ।।४७।।
महाराजांचे आज्ञेत । राहोनी सदा रत ।। ऊज्वल भविष्यकाल । साधण्या तत्पर ।।४८।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते एकादशोध्याय: ।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय १२ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
शस्त्रक्रिया झाल्यापासून । झाली प्रकृती क्षीण ।। परी आशावाद पूर्ण । बोलतांना होती त्रस्त ।।२।।
धर्म साहित्य संपादन । तैसे कृषिकर्म ।। दोघे शिष्य आपण । करीती आनंदे ।।३।।
गायन वादनाची । दोघां आवड अती ।। भजनी तल्लीन होती । जगन्नाथ गुरु ।।४।।
शास्त्रे वदती समस्त । संगीत म्हणजे पंचम वेद ।। साम मी वेदात । कृष्ण बोलले गीतेत ।।५।।
जेथ चाले गायन । तेथ ईश अधिष्ठान ।। भगवंताचे वचन । मद्भक्ता यत्र गायन्ति ।।६।।
अष्टौप्रहर एकच । सत्पंथ वर्धन ध्यास ।। गुरुकुल हे प्रत्यक्ष । वाटे सांदीपनींचे ।।७।।
पंथ धर्मा व्यतिरीक्त । नसे अन्य चर्चासत्र ।। सत् परिणाम पूरक । असे मंदीरी शांतता ।।८।।
असतां शांतता मंदीरी । तेथे देवत्व वास करी ।। चिंता दुःख बोहरी । न स्पर्शिती ऐसे स्थान ।।९।।
प्रातःसायं पूजाविधी । अविरत मंदीरी होती ।। तीर्थ प्राशने शुध्द होती । भक्त सत्पंथाचे ।।१०।।
दशावतार सप्ताह । होती गावागावात ।। आशिर्वचे समस्तांस । श्री इमामगुरु ।।११।।
एकदां भक्तां समवेत । होते गुरु जगन्नाथ ।। आपुले भक्त जनांस । कथिती सुमंगलम् ।।१२।।
कवणही धर्ममार्ग । कदा नोहे असत्य ।। अनुसरावे वैदीक मार्गास । प्रकाशरुप असे ।।१३।।
धर्म वा पंथ । बाह्य दिसती विविध ।। सर्वांसी आधार एक । मूळतत्त्व म्हणती तया ।।१४।।
कोणत्याही धर्मग्रंथात । न कथिले विघातकत्व ।। समदृष्टी असावी सर्वांस । धर्मग्रंथ ऐसे बोलती ।।१५।।
इस्लाम धर्माचे तत्व । ईश्वर असे एकच ।। प्रमाण तयास । सुर-ए-इखलास असे ।।१६।।
हेच तत्त्व गीतेत । सांगती कृष्णनाथ ।। सर्व भूतांतरी मीच । चराचरी व्याप्त असे ।।१७।।

प्रत्येक धर्मानुसार । वेगळे देव नसती सर्वास ।। सर्व धर्मांची तत्त्वे । विविध भाषे एकच असती ।।१८।।
जगती महात्मे जन्मुन । करीती ईश तत्त्व विवरण ।। परमेश्वराचा एक धर्म । जैसा एकच ईश्वर ।।१९।।
ऐहीक सुखे भोगुन । करावे परमार्थ साधन ।। मते जरी विभिन्न । अंती एक तत्वी मिळती ।।२०।।
अमंग भेदाभेद । तयातुन ऊठे अभिनिवेश ।। धर्मकंदनातुनी विशेष । व्यय लय समस्तांचा ।।२१।।
धर्माच्या विकृत कल्पना । क्षोभविती मना ।। त्या करीती आमंत्रणा । पिशाच्यवृत्तीस ।।२२।।
अंगी संचारता पिशाच्च । करी सर्वांचा नाश ।। अंती होई ऱ्हास । मानवता धर्माचा ।।२३।।
बाह्य सर्व सोडून । जागवी अंतर्नारायण ।। मोक्षाचे सुखधाम । जे असे ।।२४।।
संतांचे संगतीत । जे रुजती संस्कार ।। तयांचा नाश । महाकाल करु न शके ।।२५।।
विश्वव्यापक होता दृष्टी । पशु मानव भेद नसती ।। सदा सर्वत्र पाहती । केवळ जीवदशा ।।२६।।
जो जगत्रया तद्रुप । सत्य, शांती प्रेमत्व ।। ईश्वरावतार वा महंत, संत । न त्यजीती आचार ।।२७।।
जे संतवचने वागले । त्यांचे जन्म कृतार्थ झाले ।। दया क्षमेचे सोहाळे । फुलती मळे मानवतेचे ।।२८।।
कदां न ठेवावे ऋण । परी मत्सरादीक न फेडावे ऋण ।। जयाचे कर्म त्याला कारण । वाईट वा ऊत्तम ।।२९।।
जयाची क्रिया तयास । होतसे तारक वा मारक ।। ज्याचा तो कारक । चिंतीला परा ते ये घरा ।।३०।।
जगताच्या कल्याणासाठी । संत महंत जन्मा येती ।। त्यांच्या पुण्यशलाका असती । कोस परिघ भूमीत ।।३१।।
वैर हत्या ऋण । राहे जन्मांतरी घर करुन ।। म्हणुन ऐसे अग्नीबाण । कदा न रक्षावे आपणापासी ।।३२।।
पुण्यात्मक पुण्याईने । स्वर्गसुख लाभणे ।। आणि पापात्मक पुण्ये । नरक लाभ होतसे ।।३३।।
जरी विचार येती हीन । तदा करावे गुरुस्मरण ।। वा हरी स्मरणे करुन । साधावी पवन माळा ।।३४।।
हीन वृत्ती येता मनात । पुण्याचा करीती नाश ।। स्थिर असता चित्त । पावे क्षणांत चंचलता ।।३५।।
चंचल विद्युलता । मनोऱ्यावरी कोसळे देखा ।। ईश्वर झाला रक्षीता । विध्वंस मंदीराचा ।।३६।।

याचे असे कारण । मंदीरी सर्वदा संकीर्तन ।। शुध्द लहरींचे ऊन्मीलन । विजेस रोधीती ।।३७।।
गुरु इमाम अवतरुन । केले सत्मार्ग ऊध्दरण ।। सत्पंथ तया नाम । तो सनातन वैदीक ।।३८।।
वैदीक धर्म आचरण । करावित वेदोक्त कर्म ।। त्यजावे कर्मठपण । कारण अहंकारासी ।।३९।।
जेथे वसे अहंकार । तेथे नसे सोहंकार ।। हवी करुनी तयास । हवन करावे ॐकारी ।।४०।।
म्हणुनी श्री ज्ञानदेव । जाणूनी विश्वात्मभाव ।। मागती दान पसाय । विश्वात्मकासी ।।४१।।
जावो हिनांचे हीनपण । रुची वाढी सत्कर्म ।। मानवतेचे व्हावे वर्धन । प्राणीमात्रा वसो मैत्री ।।४२।।
जी कामना जयासी । ती पावो पूर्णत्वेसी ।। आणि स्वधर्मासी । लाभो प्रकाश पुरुषोत्तमा ।।४३।।
या भूमंडळात । जन ऊपजोत ईश्वरनिष्ठ ।। समस्त चित्ती वसोत । प्रकाश पावित्र्याचे ।।४४।।
ऐसा अमोघ ऊपदेश । महाराज करीती भक्तांस ।। जैसा कुमारीक्षेत्रांत । गुरु इमाम ऊपदेशीती ।।४५।।
जरी देवाचा अवतार । वा महंत सिध्द ।। एकदाच करीती ऊपदेश । वारंवार ना करीती ।।४६।।
एकदाच कृष्णे केला ऊपदेश । गीता म्हणती तयास ।। महंमद पैगंबर वा ख्रिस्त । एकदांच ऊपदेशीले भक्तांस ।।४७।।
हेत जन मनोरंजन । असो कीर्तन वा प्रवचन ।। ते परमार्थाचे जाण । वांझपण जाणावे ।।४८।।
गुरु जगन्नाथ । केला भक्तां ऊपदेश ।। परावाणीतून ऊद्भव । ईश्वरी शब्दांचा ।।४९।।
ईश्वराचे शब्द । होती एकदाच प्रकट ।। पुन्हा न ते स्मरत । वक्त्यासी ।।५०।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते द्वादशोध्याय: ।।
श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय १३ वा

ॐ परमात्मने नम : । ॐ श्री दत्तात्रेयाय नमः ।। ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ।।१।।
श्री महाराज जगन्नाथ । पाजवुनी ऊपदेशामृत ।। भक्तांसी तोषवित । सत्यमार्ग संबोधोनी ।।२।।
इमामशाहांचे साहित्य । असे गुर्जर मिश्र भाषेत ।। ते महाराष्ट्र भाषेत । अर्थांतरीत करीती ।।३।।
सोडीले नाहीं मूळ सुत्र । तैसेच राखुनी तत्त्व ।। निर्मिती नूतन ग्रंथ । ज्ञान होण्या महाराष्ट्रीय भक्तांसी ।।४।।
घटपाट पुजेचे मंत्र । असती अथर्ववेद प्रमाणभूत ।। ते गुर्जर भाषेत । निवेदीले इमामशाहांनी ।।५।।
मूळ वेदोक्त मंत्र । गुर्जर भाषांतरीत ।। ते मराठीत । भाषांतरीले महाराजांनी ।।६।।
सत्पंथातील कर्मकांड । घटपाटादी अन्य पुजातंत्र ।। निर्माण केला ग्रंथ । घटपाट पुजा यज्ञविधी ।।७।।
इसविसन दोनहजार एक । सव्वीस जुलै दिनांक ।। ग्रंथ केला प्रकाशित । सहस्त्रावधी भक्त होते ।।८।।
पूण्याचे दत्त ऊपासक । होते ग्रंथ प्रकाशनास ।। त्यांनी इमामशाह ज्ञानामृत ग्रंथ । लिहीला इश प्रेरणे ।।९।।
त्याच शुभ समयास । महाराजा केला ग्रंथ समर्पित ।। हक्क अधिकारादी समस्त । दीधले फैजपूर मंदीरा ।।१०।।
त्याच वर्षी धनत्रयोदशीस । प्रथम अध्याय करुनी मुद्रीत ।। पुजा यथाविध । केली ग्रंथाची ।।११।।
पाहूनी ओवीबध्द ग्रंथ । महाराज अत्यानंदीत ।। म्हणती पारायणास । नसे पूर्वी ग्रंथ ।।१२।।
म्हणती भागवता प्रमाणे । करु याचे पारायण ।। प्रात:संहीता वाचन । अर्थ निरुपण सायंतेसी ।।१३।।
वस्त्रे श्रीफळ देऊन । ग्रंथ कर्त्याचा केला सन्मान ।। म्हणाले इमामगुरुंचे आपण । असाल संबंधीत ।।१४।।
जन्मांतरीचा संबंध म्हणून । ग्रंथ झाला आपणाकडून ।। विशेष म्हणजे आशिर्वचन । ग्रंथास इमाम गुरुंचे ।।१५।।
गिरीनार पर्वती करता गमन । झाले तयां दत्तदर्शन ।। आणि बोलले भगवान । मीच ब्रम्हदत्त पीराण्यासी ।।१६।।

असेल जन्मार्जित पुण्य । गुरुकृपा वरदान ।। तरच होत प्रभूदर्शन । गिरनार पर्वती ।।१७।।
सव्वीस सत्तावीस नोव्हेंबरात । पीराण्याचे पीठाधीश ।। सत्पंथाचार्य भूषविले तयांस । देऊन पदवी जगद्गुरु।।१८।।
त्या समारंभास । महाराज ऊपस्थित पीराण्यास ।। प्रत्यक्ष नेत्री पहात । सत्पंथा मान्यता वेदोक्त ।।१९।।
कीती एक संत महंत । ऊपस्थिती पिराण्यात ।। आणि महा ब्रम्हानंद । पिराण्यात प्रवर्तला ।।२०।।
जो आवडे समस्तांस । तोची आवडे देवास ।। आपुले स्थानी नेण्यास । असे आर्त ऊत्सुक देवता ।।२१।।
म्हणून महंत । स्विकारीती एकांत ।। तया जनमानसांत । नसे रुची राहण्यासी ।।२२।।
म्हणुन सिध्द महंताने । देवाचे लाडके न होणे ।। देवाने आपुल्या सिंहासनी बसणे । आपण वसावे आपुल्या स्थानी।।२३।।
म्हणुन ऋषीमुनीस । नावडे कदा देवलोक ।। अती परिचय वर्ज्य । असावा सर्वस्थानी ।।२४।।
तो देव असो वा मानव । नियम सर्वांसी एक ।। गुरु सांदीपनी, वसिष्ठ । आजन्म राहू न दिले शिष्या ।।२५।।
शर्करेची गोडी अवीट । परी येई तीयेचा वीट ।। सिध्दी विटे तपास । ऐसाही असे प्रत्यय ।।२६।।
आपणावरी देवसत्ता । नकारावी सर्वथा ।। ब्रम्हांड म्हणती पिंडा । सत्ता तयावर आत्म्याची ।।२७।।
दान ईच्छी भूमी त्रिपाद । वामने फसविले बळीस ।। कर्म भोगणे न चुके देवास । द्वारपाल ठेला पाताळी ।।२८।।
विष्णूने फसविले वृंदेस । त्यास जखडी शाप ।। पाषाण होऊनी त्वरीत । तुळस पदी राहीला ।।२९।।
आपण करावे तपाचरण । नसावे परी देवाधीन ।। कदापि वरदान । मागू नये देवतेसी ।।३०।।
वर म्हणजे करार । तुटणे तयाचा धर्म थोर ।। वरदाना पूर्वी विचार । करीती देवता मोडण्याचा ।।३१।।
न्याय वा वरदान । न ईच्छावे देवाकडून ।। दया क्षमा म्हणून । वंदन करावे ।।३२।।
होत असतां पंथ ऊत्कर्ष । ना कळे न रुचे कोणास ।। वा लागली कोणाची दृष्ट । किंवा पातली अष्टग्रही ।।३३।।
पीराण्याहून परत येता । वाटे महाराजांसी अस्वस्थता ।। परी त्रयस्था । ना दीधली जाणीव ।।३४।।

सिध्द माहात्म्यांची ऐसी गत। येतां अखेरीचे दिवस ।। स्विकारीती एकांत शांत चित्त। बहूधा मौन राखती ।।३५।।
होणार जी घटना । त्याची लाभे पूर्व सूचना ।। पचवुनी अंतस्थ यातना । राहती गंभीर ।।३६।।
नसे सुख नसे दु:ख । नसे आप्त नसे मित्र ।। इह लोकीचा यात्रिक । वागे त्रयस्थे ।।३७।।
मन होतसे अमन । चित्त होतसे क्षीण ।। आणि क्षणोक्षण । आयु ऊणे होतसे ।।३८।।
मनी ऊद्‌भवे प्रसंग । गुरु इमामे परतविले काळदूत ।। अंतरी होतसे जागर । मीच स्वयं ब्रम्हरुप ।।३९।।
पूर्व जन्मीचा भाभाराम । स्मरतसे गुरु इमाम ।। मजसी आपणाहून । नसे अन्य कोणी ।।४०।।
बसे धक्का पीराण्यास । थरारली कनकवीट ।। कल्पसुमांचा वर्षाव । अदृश्ये होतसे ।।४१।।
सन दोन हजार एक । चौदा डिसेंबर दिनांक ।। सकाळ पासून मंदीरात । वाहे वारे गांभिर्याचे ।।४२।।
कोणा कांही ना कळे । सर्वत्र मौन संचारले ।। अन्नाचे रसत्व गेले । वीटली तृष्णा जलासी ।।४३।।
अंतराळी फिरती घारी । टकटक मनोऱ्यावरी ।। सूर्यप्रभा निमाली । अस्त मार्ग धुमावला ।।४४।।
मंदीरातील घृतज्योत । श्वेत जाहली निस्तेज ।। आणि सरतसे ओज । महाराज मुखावरी ।।४५।।
सूर्य जाऊ पाहे अस्तास । तयासवे ज्ञानादीत्य ।। पाहतसे सर्वत्र । इहलोकींचे आप्त आपुले ।।४६।।
आणि पांच वाजून । जाहली मिनीटे पंचावन्न ।। घटतसे घटी प्रमाण । हालले मूलाधार ।।४७।।
मूलाधार गदगदता । हृदय विकारा तीव्र झटका ।। तात्काळ झाला विझविता । महाराजांचे प्राणज्योतीसी ।।४८।।
परी महाराजांची आत्मज्योत । विहरली अंतराळांत ।। तैसीच विलीन होत । मूर्तीत इमामशाहांच्या ।।४९।।
जाहला सर्वत्र आकांत । ग्रामांत गेली मात ।। श्री गुरु जगन्नाथ । साधिला ब्रम्हलोक ।।५०।।
गांवोगांवीचे आले जन । घेती गुरुंचे अंतीम दर्शन ।। दिसे देहा सजीवपण । निर्जीव जरी होते ।।५१।।
अंत्ययात्रा दुसरे दीवशी । जनसमुदाय घे दर्शनासी ।। अश्रु ना ऊरले नेत्रासी । शुष्क झाला वरुण ।।५२।।

शेतात गुरूंचे निकटी । भूमीडाग दिला महाराजांसी ।। जनार्दन, पूर्णानंद पोरके होती । बेबीताईस दुःख नावरे ।।५३।।
परित्यक्तेचे दुःख । बंधु वियोगाचे अमीत पट ।। परी ऐशा दुःखास । शांततेविण इलाज नसे ।।५४।।
अश्रुपतन नेत्रांतून । असे नियतो नियम ।। नाहींतर मस्तकी वात जाऊन । घडे विपरीत ।।५५।।
गुरुंचे औध्वोदीक । करीती जनार्दन पूर्णानंद ।। शमन करणे दुःखास । तया औषध काल असे ।।५६।।
अंत्ययात्रेचे वर्णन । करुं नये अधिक ।। गतस्मृतीतील दुःख । ऊद्भवे पुनरपी ।।५७।।
कोण म्हणती महाराज गेले । केवळ दृष्टीआड झाले ।। करीतां इमाममूर्तीस त्राटक । प्रत्यक्ष दर्शन होईल ।।५८।।
इमामशाह होता समाधिस्थ । दुसरे दिवशी भक्तांसी बोलत ।। पुनरुपी झाले अदृश्य । ज्ञानी जाणती सत्यता ।।५९।।
गुरुंचे कार्य ऊर्वरीत । करतील जनार्दन पूर्णानंद ।। तयांसी मार्गदर्शक । असतील बेबीताई ।।६०।।
भाभारामाची सेवा करुन । कीकीबाई झाल्या धन्य ।। संकेताचे सूचन । घ्यावे जाणून श्रोत्यांनी ।।६१।।
जय जय गुरु इमाम । जन्मोजन्मी शिष्या अवधान ।। आज माघ वद्य त्रयोदशी जाण । प्रदोष काली अध्याय पूर्त ।।६२।।
भाभारामांची ज्योत । वर्तली शिवलींगात ।। इमामशाह शिवस्वरुप । तेथे जगन्नाथ अदृश्ये ।।६३।।
महाशिवरात्र ऊदयीक । यामपूजा मध्यरातीस ।। चतुर्दशाध्यायी शिवस्वरुप । प्रत्यक्ष प्रमाण दावीन ।।६४।।
चौदावे रत्न अमृत । निघेल जगन्नाथ चरित्र मंथनात ।। श्रोते प्राशाल अमृत । वाहावा बेल मोहर गुरुंसी ।।६५।।
अध्याय जगन्नाथ पासष्टी । येथ होतसे पूर्ती ।। श्रवणमात्रे सुखावती । होते चतुर्दशांत ।।६६।।

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते त्रयोदशोध्याय : ।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

अध्याय १४ वा

ॐ परमात्मने नमः। ॐ श्री दत्तात्रेयाय नमः॥ ॐ श्री सरस्वत्यै नमः। ॐ श्री निष्कलंकी नारायणाय नमः ॥१॥
नमस्ते शारदे देवी। सरस्वती मतीप्रदे ॥ वस त्वं मम जिव्हाग्रे। सर्व विद्या प्रदाभव ॥२॥
महाराज गेले निघून। हे केवळ अज्ञान ॥ असती अदृश्य सूक्ष्म। दिव्य दृष्टिने दिसतील ॥३॥
नोहे हा भाव अगतिक। असे पूर्ण सत्य ॥ तयाच्या प्रमाणार्थ। कांही दाखले दाविन ॥४॥
अक्कलकोटी स्वामी समर्थ। झाले मंगळवारी समाधिस्थ॥ आणि निले गांवास। गेले रवीवारी भक्ता घरी ॥५॥
श्री नरसिंह सरस्वती। तयां आळंदीचे स्वामी म्हणती॥ दोन प्रहरी समाधित बसती। रात्री भक्ताघरी रत्नागिरीत ॥६॥
सांगती प्रज्ञावर्धन स्तोत्र। लिहून घेई भक्त ॥ आणि पहाटेस। अदृश्य झाले ॥७॥
चिदंबर दिक्षीत। शिव अवतार ख्यात॥ देह त्यजुनी पंचत्व। चार दिवसांनी पुत्रा भेटले पंढरपुरी ॥८॥
सन दोन हजार एक। चौदा डिसेंबर दिनांक॥ पहाटे ध्यानात। आले जगन्नाथ महाराज ॥९॥
काळवंडले मुख। भगवी कोपरी अंगात॥ वदन म्लान अत्यंत। नव्हता फेटा शीरी ॥१०॥
आणि वदले मज। नका विसरु आम्हांस॥ जेथ इमाम तेथें आम्हीच। भाव ऐसा ठेवावा ॥११॥
फैजपूर घर तुमचेच। नको मनी संकोच॥ जरी प्रत्यक्ष संबंध। एकदाच आला ॥१२॥
माझीच आठवण। दीधले भगवे वसन॥ करावे ते जतन। नकारितां आपण दिधले बळेच ॥१३॥
आणि जाहले अंतर्धान। आले देहा जागृतपण॥ जाहली बेचैन। लागे मना रुखरुख ॥१४॥
दिवसाचे क्षण। लोटती युगा समान॥ आला पाऊस घन दाटून। दुपारचे वेळीं ॥१५॥
होते मन विषण्ण। नसे काही अनुमान॥ संतकृपा कार्यालयातून। निघालो पांच वाजतां ॥१६॥
आक्रमीत पथ। आलो तुळसी बागेत॥ जबरदस्त लागली ठेच। जीव कळवळला ॥१७॥
तैसाच घरी येत। आणि झाले घरी श्रृत॥ कोणी संबंधीत। गेले परलोका ॥१८॥

आधिच विषण्ण अवस्थेत । तयांत भर अधिक ।। चित्त ठेऊनी शांत । तैसाची बैसलो ।।१९।।
गेले सात वाजुनी । दत्ता भारंबे करीती दूरध्वनी ।। गंभीर शब्द आले श्रवणी । गेले जगन्नाथ महाराज ।।२०।।
पहाटेपासून त्या वेळेपर्यंत । चित्रे झाली साकारित ।। कां मना रुखरुख । आले जाणुनी ।।२१।।
अवलोकावा अध्याय सात । कथिले जे शेष ।। फकीर वदला मज । ते इमाम ऐसी मम धारणा ।।२२।।
दहा फेब्रुवारी दोन हजार तीन । आरंभिले ग्रंथ लेखन ।। बारा फेब्रुवारीस महाराज दर्शन । तो ग्रंथा आशीर्वाद ।।२३।।
त्याच दिवशी फैजपूरास । महाराज दर्शन लिहीले पत्र ।। घडले जे सत्य । ते प्रमाणार्थ दाविले ।।२४।।
मंदीरी प्रत्यक्ष होते । ते सूक्ष्में इमाममूर्तीत सामावले ।। जगन्नाथ महाराज नाही गेले । अद्याप तेथ आहेत ।।२५।।
इह ग्रंथ प्रत्यक्ष । असे महाराजांचे वाङःमय रुप ।। इमाम गुरुंचा प्रसाद । आशीर्वाद महाराजांचा ।।२६।।
लघु असे ग्रंथ । एका बैठकीत करावा पाठ ।। इमाममूर्ती सम्यक । लाभ विशेष ।।२७।।
जन्मनक्षत्र वा शुभ दीन । करावा ग्रंथ पारायण ।। त्रयोदशी वा पौर्णिमा लक्षुन । दिनमानता विशेष ।।२८।।
प्रात:वा सातंतेस । करीता ग्रंथ पाठ ।। पौर्णिमा एकादशांत । देतील महाराज दृष्टांत ।।२९।।
चातुर्मासात । ग्रंथ असावा अनुष्ठानास ।। वा श्रावणांत । पाठ करावे एकतीस ।।३०।।
कामना जयांची होत । करावेत पाठ अविरत ।। दृष्टांत होयी पर्यंत । अनुष्ठान असावे ।।३१।।
अनुष्ठान होतां पूर्त । करावा कोरा प्रसाद ।। भक्तादि आप्तांस । प्रसाद वितरण ।।३२।।
स्त्री पुरुष सर्वांसी । असे अधिकार पठणासी ।। अनुभव येतां कवणासी । फैजपूर मंदीरी करावी नोंद ।।३३।।
पूर्ण होतां पाठ । आरती आदी कृत्य ।। जय श्री गुरुदयाळ स्तोत्र । आदरे म्हणावे ।।३४।।
सदर स्तोत्र । आहे ज्ञानामृत ग्रंथात ।। गुरु दर्शन होण्यास । आळविले भक्तांनी ।।३५।।
स्तोत्र असे प्रसाद । रात्री म्हणावे नित्य ।। तरीही कृपेश । होती श्रीगुरु ।।३६।।
आज वद्य त्रयोदशी माघांत । महाराज शिवस्वरुप ।। वाहतो बिल्वभाव । तयां मस्तकी ।।३७।।
आतां एक विनंती महाराजांसी । करावे अवलोकन ग्रंथासी ।। आणि पठण कर्त्यासी । द्यावे इच्छीत फळ ।।३८।।

शुध्द वस्त्री गुंडाळोन । करावा ग्रंथ जतन ।। गुरु इमाम तव आशिषे म्हणून । ग्रंथारंभ करावा ।।३९।।
ग्रंथ होतां पठण । करावे ग्रंथ पूजन ।। जगन्नाथ ध्यानी आणून । वंदन करावे ।।४०।।
प्रसाद युक्त ग्रंथ । करील आर्त पुर्त ।। वाङःमयीन कल्पपुष्प । गुरुपदी वाहीले ।।४१।।

ऊपसंहार ।।

गोपाळ नाम हरीपुत्र । करमरकर उपाख्य ।। वास पुणे शहरांत । निर्मिला प्रसाद गुरु ईच्छे ।।४२।।
मम भाग्य विशेष । गुरु इमाम आज्ञावीती ग्रंथास ।। आणि महाराज जगन्नाथ । आशीर्वाद देती ।।४३।।
सर्वांनी असावे सुखांत । निरामय अवस्थेत ।। सदा सद्गुरु ध्यास । क्रमावे जीवन ।।४४।।
गुरुशब्दे वर्तता । विजयश्री सर्वथा ।। प्रापंचिक दुःख चिंता । निवारण होतसे ।।४५।।
जय गुरु पुरुषोत्तम । जय गुरु जगन्नाथ ।। वंदुनी तयां साष्टांग । लेखन इति करीतसे ।।४६।।

हरि ॐ तत्सत्

इति श्री जगन्नाथ चरित्रामृते चतुर्दशोध्यायः ।।

श्री नारायणार्पणमस्तु ।। शुभम् भवतु ।।

इति श्री जगन्नाथविजय ग्रंथ समाप्तः ।।

संदर्भ ग्रंथ - ।। रथ जगन्नाथाचा ।।
लेखक - डॉ. श. रा. राणे
सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर

चिनावल येथील नारखेडे परिवाराकडून साहित्य प्रकाशनासाठी रु. ३०,००० मात्र मिळाले.



कै. शंकर ओंकार नारखेडे



गं.भा. लिलाबाई शंकर नारखेडे



श्री. सुरेश शंकर नारखेडे



सौ. इंदूबाई सुरेश नारखेडे



श्री. निळकंठ शंकर नारखेडे

फर्म
मयुर केला सप्लायर्स
चिनावल ता. रावेर



सौ. भारतीबाई निळकंठ नारखेडे



श्री. नंदकिशोर शंकर नारखेडे

फर्म
मे. निलेश मेडिकल अॅन्ड जनरल स्टोअर्स
चिनावल ता. रावेर



सौ. विजयाबाई नंदकिशोर नारखेडे

सत्पंथ साहित्य प्रकाशन फैजपूर, नारखेडे परिवार चिनावल यांचे आभारी आहे.



प.पू. आचार्य
श्री. जनार्दन महाराज



प.पू. जगद्‌गुरु सत्पंथाचार्य
श्री. नानकदासजी महाराज



प.पू. आचार्य
श्री. पूर्णानंद महाराज

'श्री जगन्नाथविजय' ह्या ग्रंथाचे प्रकाशन **मंगळवार दि. १४ डिसेंबर २००४** या दिवशी **जगद्‌गुरु सत्पंथाचार्य श्री नानकदासजी महाराज,** (वर्तमान गादीपती प्रेरणापीठ, पिराणा) यांचे शुभहस्ते झाले. हा एक योगायोगच म्हणावा लागेल. सत्पंथाच्या प्रमुख पिठाला म्हणजे पिराणा पिठाला **'जगद्‌गुरु पिठ'** म्हणून मान्यता मिळाली यात ब्र. संतश्री जगन्नाथ महाराज यांचा सिंहाचा वाटा आहे. प.पू. जगन्नाथ महाराजांनी पंथाच्या प्रचारासाठी, पंथाची तत्त्वे अनुयायांना समजावण्यासाठी घेतलेले अतोनात कष्ट लक्षात घेता त्यांच्यामुळेच की काय **'जगद्‌गुरु पद'** सत्पंथाला लाभले. अशा या दिव्य आत्म्यास कोटी कोटी नमस्कार.

आचार्य श्री. जनार्दन महाराज
आचार्य श्री. पूर्णानंद महाराज
सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर